cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–८ | शुक्रवार दि.२७ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### आश्वासनांपेक्षा कृतीची गरज

आखातात युद्ध भडकून जवळपास तीन आठवडे उलटून गेल्यानंतर पंतप्रधानांनी संसदेत आपली भूमिका मांडली, ही बाब स्वत:मध्येच अनेक प्रश्न उपस्थित करणारी ठरते. इतका काळ देशाचे सर्वोच्च नेतृत्व या संवेदनशील विषयावर मौन का बाळगत होते, याविषयी जनतेत आणि विरोधकांत सातत्याने चर्चा सुरू होती. अखेर पंतप्रधानांचे भाषण जाहीर झाल्यानंतर देशाचे लक्ष त्या संबोधनाकडे लागले होते. मात्र, या भाषणातून अपेक्षित ठोस दिशा किंवा दिलासा मिळण्याऐवजी चिंतेची छाया अधिक गडद झाल्याचे चित्र दिसून आले.


# शेतात पिके आडवी, प्रशासन मात्र ढिम्म!

## गारपिठीत नुकसानीचे पंचनामेच नाहीत, शेतकरी संकटात

पुणे । प्रतिनिधी

**अवकाळी पाऊस आणि गारपिटीच्या तडाख्याने मराठवाड्यासह राज्यातील अनेक भागातील शेतकरी अक्षरश: उद्ध्वस्त झाले आहेत. शेकडो हेक्टरवरील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकऱ्यांच्या कष्टाचे पीक काही क्षणात जमीनदोस्त झाले आहे. मात्र, या भीषण नैसर्गिक आपत्तीला आठवडा उलटूनही अनेक गावांमध्ये नुकसानीचे पंचनामे झाले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.**

रब्बी हंगामातील गहू, मका आणि कांदा ही प्रमुख पिके गारपिटीमुळे पूर्णपणे आडवी झाली आहेत. अनेक ठिकाणी पिके चिखलात मिसळली असून उत्पादनाची सर्व आशा संपुष्टात आली आहे. खरीप हंगामात आधीच नुकसान सहन केलेल्या शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने रब्बी पिकांची लागवड केली होती. मात्र, अवकाळी पावसाने त्यांच्या आशांवर पाणी फेरले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून कर्जबाजारीपणाचा धोका अधिकच वाढला



आहे. नुकसान झाल्यानंतर शासनाच्या नियमांनुसार तातडीने पंचनामे होणे अपेक्षित असते. परंतु प्रत्यक्षात अनेक गावांमध्ये महसूल आणि कृषी विभागाचे अधिकारी अद्याप पोहोचलेले नाहीत. सात दिवस उलटूनही प्रशासनाने साधी पाहणीही केली नसल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. त्यामुळे शासनाकडून मिळणाऱ्या मदतीस मोठा विलंब होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. ''शेतातील गहू, मका आणि कांदा पूर्णपणे आडवा झाला आहे. नुकसान इतके मोठे आहे की डोळ्यात पाणी येते, पण प्रशासनाला काहीच पडलेले नाही,'' अशी संतप्त प्रतिक्रिया अनेक शेतकरी देत आहेत. काही ठिकाणी लोकप्रतिनिधींनी प्रशासनाला सूचना दिल्या असल्या, तरीही प्रत्यक्षात कोणतीही ठोस हालचाल दिसत नसल्याचे चित्र आहे.ङ्गदरम्यान, पंचनामे लवकर न झाल्यास मदतीची प्रक्रिया आणखी लांबणीवर पडेल, अशी भीती शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. आधीच बाजारभावातील चढ–उतार, उत्पादन खर्च वाढ आणि कर्जाचा बोजा यामुळे शेतकरी अडचणीत आहे. त्यातच नैसर्गिक आपत्ती आणि प्रशासनाची दिरंगाई यामुळे परिस्थिती आणखी ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### कोकणातील बागायतदारांची क्रूर थट्टा – राजू शेट्टी

मुंबई: नैसर्गिक आपत्तीमुळे कोकणातील आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांवर मोठे संकट आले होते. जवळपास ९० टक्के पीक हातातून गेले आहे. अशा परिस्थितीत गेली दोन महिने कोकणातील शेतकरी पहिल्यांदाच रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. असे असताना सरकारने केवळ हेक्टरी २२ हजार रुपयांची मदत जाहीर करुन त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे. ही मदतीच्या नावाखाली केलेली क्रूर थट्टा आहे, अशी टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी केली आहे. आता सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, रायगड आणि ठाणे या जिल्ह्यातील आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांचा एक प्रचंड असा मोर्चा मुंबईत धडकल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे. ज्या शेतकऱ्यांनी फळपीक विमा काढला आहे, त्यांना हेक्टरी ४२ हजार रुपये मिळतील. तर ज्यांना पीक संरक्षण नाही, त्यांना हेक्टरी २२ हजार मदत देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. २६ मार्च) विधानसभेत केली. या मदतीच्या घोषणेवर राजू शेट्टी यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

### युद्धाच्या पार्श्वभुमीवर मोदी मुख्यमंत्र्यांसोबत घेणार बैठक

नवी दिल्ली: पश्चिम आशियामध्ये वाढत चाललेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची एक आभासी बैठक बोलावली आहे. पंतप्रधान मोदी शुक्रवारी मुख्यमंत्र्यांशी संवाद साधून सुरू असलेल्या युद्धावर चर्चा करतील. या बैठकीचा मुख्य उद्देश संकटकाळात समन्वय राखणे आणि टीम इंडिया या भावनेतून एकसंध दृष्टिकोन विकसित करणे हा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बोलवल्या बैठकीत आगामी काळात निवडणुका होणार्या राज्यांमधील मुख्यमंत्री सहभागी होण्याची शक्यता कमी आहे. युद्धाचे जागतिक आणि देशांतर्गत पडसाद दीर्घकाळ उमटू शकतात, असा इशारा देतानाच पंतप्रधान मोदी यांनी पूर्वतयारी आणि लवचिकतेवर भर दिला आहे. संसदेला संबोधित करताना मोदींनी या युद्धाचे वर्णन जागतिक ऊर्जा संकटाचे कारण असे केले. परिस्थिती अशीच राहिली, तर त्याचे परिणाम अटळ असून ते प्रदीर्घ काळ टिकू शकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### ठाकरे गटाच्या बैठकीत राडा; प्रियंका चतुर्वेदी भडकल्या

मुंबई : शिवसेनेत (ठाकरे) राज्यसभेच्या जागेवरून धुसफूस असल्याचे समोर येत आहे. नुकत्याच झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील सात जागांसाठी बिनविरोध निवडणूक झाली. या निवडणुकीत शिवसेनेच्या वाट्याला येणारी जागा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला सोडण्यात आली. महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून पवारांची राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली, तर भाजपचे चार आणि शिवसेना (शिंदे), राष्ट्रवादी (अजित पवार) यांचा प्रत्येकी एक उमेदवार यांची बिनविरोध निवड झाली. शिवसेनेच्या (ठाकरे) मावळत्या राज्यसभा खासदार प्रियंका चतुर्वेदी बैठकीत आक्रमक झाल्याची माहिती समोर येत आहे. शिवसेना नेते संजय राऊत यांनी हे वृत्त फेटाळले आहे, मी त्या बैठकीला नव्हतो, मात्र तिथे असे काही घडलेले नाही असे ते म्हणाले.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२४ मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २५४.०० क्विंटल | २,१६० | २,५०० | २,२४० |
| ज्वारी/हायब्रिड: १८८.०० क्विंटल | १,८०० | ४,५०० | ३,४४७ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.०० क्विंटल | ६,५०० | ७,००० | ६,७५० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: ४.०० क्विंटल | २,००० | २,७३१ | २,४१० |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ५,३५० | ५,३५० | ५,३५० |
| हरभरा: १९.०० क्विंटल | ४,९०० | ५,८०१ | ५,१७५ |

# देणगीपोटी भाजपला एका वर्षात मिळाले ६ हजार कोटी

## सर्वाधिक देणगी कॉर्पोरेट सेक्टरमधून; काँग्रेससह ४ पक्षांच्या दहापट देणगी

दिल्ली । वृत्तसंस्था

**देशातील राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्या, निधींबाबत आता मोठा खुलासा एका अहवालातून झाला आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स (एडीआर)च्या अहवालानुसार २०२४–२५ या आर्थिक वर्षात राष्ट्रीय राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्यांमध्ये १६१ टक्के इतकी वाढ झाल्याचे दिसून आले आहे. यात सर्वाधिक देणगी ही भारतीय जनता पार्टीला मिळाली आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर काँग्रेस आहे.**



राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्यांमध्ये २० हजार रुपयांपेक्षा जितक्या देणग्या देण्यात आल्या त्यातही भाजपलाच सर्वाधिक देणग्या मिळाल्या आहेत. २० हजार रुपयांपेक्षा जास्त देणगी ११ हजार ३४३ जणांनी दिलीय. यातून एकूण तब्बल ६ हजार ६४८ कोटी रुपयांपेक्षा जास्त देणगी दिली गेली. यापैकी एकट्या भाजपला ६ हजार ७४ कोटी रुपये ५ हजार ५२२ जणांकडून देण्यात आलेत. तर दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या काँग्रेसला २ हजार ५०० जणांकडून ५१७.३९ कोटी रुपये देणगीपोटी मिळाले. भाजपला मिळालेली देणगी ही काँग्रेस, आप, माकप, एनपीपी या पक्षांना मिळालेल्या एकूण देणगीच्या दहापटींहून जास्त आहे. यात बहुजन समाज ▶▶ पान २ वर

# रेशनकार्डधारकांना मिळणार ३ लिटर केरोसीन

मुंबई प्रतिनिधी

आखाती देशांमध्ये सुरू असणाऱ्या युद्धाचा जगावर परिणाम होत आहे. यामुळे इंधनाचा आणि एलपीजी गॅसचा काही प्रमाणात तुटवडा निर्माण झाला आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर सरकारने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. सध्या एलपीजी गॅसच्या किमती वाढल्या आहेत, तसेच एलपीजी गॅस बुकिंगचा कालावधी वाढला आहे त्यामुळे नागरिकांना खूप वाट पाहावी लागते. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. केंद्र सरकारकडून ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपाला मंजुरी दिली आहे.

राज्यातील नागरिकांना केरोसीन वापरण्यास परवानगी मिळाली आहे. आता रेशन कार्डधारकांना केरोसीन मिळणार आहे. केरोसीनचा वापर करून स्टोव्हवर जेवण बनवू शकता, या उद्देशाने हा निर्णय घेतला आहे. एलपीजी गॅस तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून तात्पुरत्या स्वरूपात केरोसीन वाटप केले जाणार आहे. राज्य सरकारकडून जिल्हानिहाय ▶▶ पान २ वर

# खरात प्रकरणात नवा खुलासा

## झुंबरामागचे 'ते' गुपित आले समोर

नाशिक । प्रतिनिधी

तपासादरम्यान अशोक खरातबाबत धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. खरातने १५० हून अधिक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे समोर आले आहे. तो जोडप्यांना समोर बसवून पत्नीमुळे यशस्वी झाल्याचे पतीला सांगून महिलेच्या मनात सहानुभूती निर्माण करायचा. तसेच तो मोठ्या अधिकारी आणि उद्योगपतींसोबत मुलींचे संबंध जुळवून द्यायचा. यासाठी तो अंकशास्त्राचा आधार घेत असल्याचे भासवायचा.



त्याच्या कार्यालयातील खास केबिनमध्ये महिलांचे लैंगिक शोषण होत असे. या केबिनच्या बाहेर असलेल्या झुंबरातील लाइट आतून बंद केल्यावर कोणालाही आत प्रवेश द्यायचा नाही, असा नियम होता. ही सांकेतिक भाषा त्याच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना माहीत होती, असे चौकशीत उघड झाले आहे.

नाशिकमधील भोंदू बाबा अशोक खरात याच्याविरुद्ध दाखल झालेल्या सर्व १० गुन्ह्यांचा तपास आता विशेष तपास पथक करणार आहे. यामुळे प्रकरणाला नवी दिशा मिळाली असून, तपास यंत्रणांना वेग येण्याची शक्यता आहे. ▶▶ पान २ वर

# ...तर परतीचा कोणताही मार्ग उरणार नाही

## युद्धविराम प्रस्तावावरून ट्रम्प यांचा इराणला इशारा

वॉशिंग्टन । वृत्तसंस्था

**मध्यपूर्वेतील संघर्ष संपवण्यासाठी अमेरिकेने इराणसमोर १५ कलमी प्रस्ताव ठेवला आहे. मात्र इराणनेही आपल्या अटींवर युद्धविराम होईल, असे स्पष्ट केले आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील मतभेद टोकाचे असून, दोन्ही बाजू आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. या तणावाच्या पार्श्वभूमीवर, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला थेट इशारा दिल्यापासून, युद्धविराम प्रस्तावाबाबत गांभीर्याने विचार करण्याचे आवाहन केले आहे.**





ट्रम्प यांनी आपल्या ट्रुथ सोशल पोस्टमध्ये इराणच्या भूमिकेवर कडाडून टीका केली. त्यांनी लिहिले, इराणी वाटाघाटी करणारे लोक खूप वेगळे आणि विचित्र आहेत. ते आम्हाला करार करण्यासाठी विनवणी ▶▶ पान २ वर

# धार्मिक सणांसाठी सार्वजनिक सुट्टी मागणीचा अधिकार नाही–सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली । वृत्तसंस्था


धर्माचे पालन करणे हा वैयक्तिक अधिकार असला, तरी त्या आधारावर सुट्टीची सक्ती करता येणार नाही. भारतीय संविधानातील अनुच्छेद २५ नुसार मिळालेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारामध्ये, एखाद्या धार्मिक प्रसंगासाठी सरकारने सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी करण्याचा अधिकार समाविष्ट नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. भारत हा एक विकसनशील देश असून, राष्ट्राच्या विकासासाठी उत्पादकता आणि कामातील सातत्य टिकवून ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे सुट्ट्यांपेक्षा कामाला अधिक ▶▶ पान २ वर


# इतिहासकार संशोधक डॉ.जयसिंगराव पवार यांचे निधन

कोल्हापूर । प्रतिनिधी

**ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे गुरुवारी (दि.२६ मार्च) पहाटे निधन झाले. त्यांनी वयाच्या ८५ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. मराठेशाहीचा खरा इतिहास जगासमोर आणणारे शाहू विचारांचे इतिहासकार म्हणून त्यांची ओळख होती. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती अस्वस्थ होती. कोल्हापुरात गुरुवारी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली.**

डॉ. जयसिंगराव पवार यांचा जन्म ३० डिसेंबर १९४१ रोजी सांगली जिल्ह्याच्या तडसर गावात झाला. त्यांनी कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठामधून एम. ए. पदवी शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी पीएचडी संपादन केली. त्यांनी महाराणी ताराबाई, सेनापती संताजी घोरपडे, मराठेशाहीचा मागोवा आणि राजश्री शाहू स्मारक असे ▶▶ पान २ वर








# नेते, भोंदू बुवा, अन 'त्या' द डर्टी पिक्चर ही फेल !

मुंबई–बीड । सुभाष चौरे

इंटरटेनमेंट, इंटरटेनमेंट, इंटरटेनमेंट हा डायलॉग द डर्टी पिक्चर मध्ये आपण ऐकला असेल. त्यातील उलाला उलाला हे गाणें तर चांगलेच गाजलं होतं. २०११ मध्ये प्रदर्शित झालेल्या द डर्टी पिक्चर ला लाजवेल किंवा हा चित्रपटही सध्याच्या परिस्थितीमध्ये फेल आहे असेच वाटण्यासारखी परिस्थिती राज्यात खरातच्या प्रकरणावरून झाली असल्याचे दिसत आहे. या चित्रपटात जे नाही ते सोशल मीडियावर नेते, भोंदू बुवा आणि त्यांची लफडे महाराष्ट्रात इंटरटेनमेंट, इंटरटेनमेंट, इंटरटेनमेंट म्हणून आनंद घेत आहेत.

सध्या राज्यामध्ये एकच ट्रेंड सुरू आहे, तो म्हणजे सोशल मीडियावर एकापाठोपाठ एक एकापाठोपाठ एक असे अनेक व्हिडिओ व्हायरल होत आहेत. हे व्हिडिओ अनेक नेते असो, भोंदू बाबा असो की बाबांच्या नावाखाली लुटणारे असो. घडणाऱ्या व समोर येणाऱ्या घटना चिंताजनक म्हणाव्यार लागतील. डिसेंबर २०११ मध्ये द डर्टी पिक्चर हा चित्रपट प्रदर्शित झाला. सिल्क स्मिता, डिस्को शांती यासारख्या समकालीन कलाकारावर हा आधारित चित्रपट होता. हा चित्रपट तसा कुटुंबाने एकत्रित पाहणे गैरच म्हणावे लागेल, असा हा चित्रपट. मात्र त्यामध्ये कहाणी अगदी वेगळी होती. या चित्रपटातील नायिका विद्या बालन या चित्रपटामुळे मोठी झाली. पैसाही कमवला. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाले.



फिल्मफेअर मध्ये उत्कृष्ट चित्रपट म्हणून नाव झाले. अभिनेत्री म्हणून तीन पुरस्कार मिळाले, मात्र या चित्रपटातील तिच्या भूमिकेमुळे ती या चित्रनगरीतून बाहेर फेकली गेली. म्हणजे जनतेच्या मनातून ती उतरली. त्यातील डायलॉगही महत्त्वाचा आहे. कुछ लोगो का नाम अपने काम से मेरा बदनाम होकर हुआ अशीच सोशल मीडियावर सध्या व्हायरल होत असलेल्या व्हिडिओ वरून अनेकांचे नाव या कृत्यामुळे राज्यभर गेल्याचं दिसत आहे.

नाशिक मधील स्वत:ला कॅप्टन म्हणून घेणाऱ्या अशोक खरात या भोंदू बाबाचे पितळ उघडे पडले. त्यामुळे राजकारणात मोठी खळबळ उडाली. महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. मात्र यानंतर या भोंदू खराताचे जे काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले त्यामुळे राज्यात एकच खळबळ उडाली. एवढेच काय पण या भोंदूकडे राज्यातील अनेक नेतेमंडळी जात असल्याचेही पुढे येऊ लागले. अनेक नेत्यांचे त्याच्याबरोबरचे फोटो देखील सोशल मीडियावर झळकू लागले. त्यामुळे हा बाबा कमी आणि लुटारू अधिक वाटू लागला. त्याने अनेक महिलांचे शोषण केले. कदाचित या घटनेपूर्वी या भोंदूचा खरा चेहरा राजकारण्यांना माहीत नसावा, परंतु आता त्यामुळेच हे नेते अडचणीत आले आहेत. हे प्रकरण सुरू असतानाच राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ या साध्या भोळ्या वाटणाऱ्या व्यक्तीचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होणे सुरू झाले आणि राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. आता असे आणखी किती व्हिडिओ समोर येणार याची उत्सुकताच राज्यातील जनतेला आगामी येणाऱ्या एखाद्या चित्रपटाची उत्सुकता प्रेक्षकांना जशी असते तशी जनतेला लागलेली दिसत आहे.

सकाळी मोबाईल सुरू केला की नवनवीन कारणामे पुढे येत आहेत. खरे पाहता ही लाजिरवाणी बाब आहे. आता यावर राजकारण सुरू होईल. पण हा प्रश्न राजीनाम्याने सुटणार का हा देखील मोठा प्रश्न आहे. उच्च पदावर असणाऱ्या व्यक्तींनी आपले चारित्र्य स्वच्छ ठेवले पाहिजे यात शंका नाही, ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# आश्वासनांपेक्षा कृतीची गरज

आखातात युद्ध भडकून जवळपास तीन आठवडे उलटून गेल्यानंतर पंतप्रधानांनी संसदेत आपली भूमिका मांडली, ही बाब स्वतःमध्येच अनेक प्रश्न उपस्थित करणारी ठरते. इतका काळ देशाचे सर्वोच्च नेतृत्व या संवेदनशील विषयावर मौन का बाळगत होते, याविषयी जनतेत आणि विरोधकांत सातत्याने चर्चा सुरू होती. अखेर पंतप्रधानांचे भाषण जाहीर झाल्यानंतर देशाचे लक्ष त्या संबोधनाकडे लागले होते. मात्र, या भाषणातून अपेक्षित ठोस दिशा किंवा दिलासा मिळण्याऐवजी चिंतेची छाया अधिक गडद झाल्याचे चित्र दिसून आले.

या संबोधनात भारताची सध्याची स्थिती, संभाव्य आव्हाने आणि त्यावर सरकारची तयारी याबाबत स्पष्ट व ठोस भूमिका मांडली जाईल, अशी अपेक्षा होती. पंतप्रधानांनी काही मुद्द्यांना स्पर्श केला खरा, पण त्यात नावीन्य किंवा ठोस धोरणात्मक स्पष्टता जाणवली नाही. उलट, आगामी काळ अधिक कठीण असणार असल्याचे संकेत त्यांनी दिल्याने जनतेच्या मनात अस्वस्थता वाढली. विशेषतः, कोरोनाकाळाचा उल्लेख करताना त्यांनी दिलेला इशारा अधिकच धास्तावणारा ठरला. ''जसे संकट आपण कोरोनाच्या काळात पाहिले, त्यासारख्या परिस्थितीसाठी तयार राहावे लागेल,'' असे ते म्हणाले. हा इशारा केवळ सावधगिरीचा नव्हता, तर संभाव्य गंभीर परिस्थितीची जाणीव करून देणारा होता. मात्र, अशा परिस्थितीत सरकार नेमकी कोणती ठोस पावले उचलत आहे, याचा तपशील मात्र त्यांनी दिला नाही. ऊर्जा सुरक्षेबाबत त्यांनी काही मुद्दे मांडले एलपीजी उत्पादन वाढवणे, इंधनाचा अखंड पुरवठा राखणे, ४१ देशांशी चर्चा, कच्च्या तेलाचा साठा वाढवणे, रिफायनिंग क्षमता वाढवणे हे सर्व ऐकायला सकारात्मक वाटणारे असले, तरी त्यात नेमकेपणा आणि पारदर्शकतेचा अभाव स्पष्टपणे जाणवतो. केवळ धोरणांची यादी मांडून जनतेला दिलासा मिळत नाही; त्यासाठी ठोस अंमलबजावणी आणि प्रत्यक्ष परिणाम दिसणे आवश्यक असते. याउलट, देशातील वास्तव परिस्थिती वेगळीच कहाणी सांगत आहे. अनेक ठिकाणी एलपीजी सिलिंडरच्या तुटवड्यामुळे ग्राहकांना लांबच लांब रांगा लावाव्या लागत आहेत, तर ब्लॅकमार्केटिंगही वाढल्याच्या तक्रारी येत आहेत. काही भागांत व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा खंडित झाला असून, किमतींमध्येही वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत ''इंधन तुटवडा नाही'' हा सरकारी दावा जनतेला पटणारा नाही. सरकारवर केवळ आश्वासने देण्याची नव्हे, तर वास्तव परिस्थिती स्पष्टपणे मांडण्याची जबाबदारी असते. जनतेमध्ये घबराट पसरू नये, हे जितके महत्त्वाचे, तितकेच वास्तव लपवणे टाळणेही गरजेचे आहे. सरकार सांगत असलेली स्थिती आणि प्रत्यक्ष अनुभव यात जेव्हा तफावत दिसते, तेव्हा लोकांचा विश्वास डळमळीत होतो आणि अस्वस्थता वाढते. इंधनसाठ्याबाबतही सरकारने स्पष्ट आकडेवारी दिलेली नाही. पेट्रोल–डिझेल किती दिवस पुरेल, याबाबत ठोस माहिती न दिल्याने संभ्रम वाढतो आहे. विविध स्रोतांकडून वेगवेगळी माहिती समोर येत असल्याने परिस्थिती अधिकच गोंधळात टाकणारी ठरते. या सगळ्या पार्श्वभूमीवर सरकारी यंत्रणांवर प्रचंड ताण असल्याचे स्पष्ट दिसते. कोरोनाकाळाचा संदर्भ देताना पंतप्रधानांनी देशाच्या एकजुटीचे कौतुक केले, मात्र त्या काळातील सरकारी अपयशही जनतेच्या स्मरणातून गेलेले नाही. अचानक लावण्यात आलेला लॉकडाउन, ऑक्सिजन आणि आरोग्य सुविधांचा तुटवडा, लसीकरणातील गोंधळ आणि स्थलांतरित कामगारांचे हाल या सगळ्या गोष्टींनी प्रशासनातील त्रुटी अधोरेखित केल्या होत्या. त्यामुळेच, आजच्या नव्या संकटात सरकार कितपत सक्षम आणि सज्ज आहे, हा प्रश्न अधिक गंभीर बनतो. युद्धामुळे निर्माण होणारे आर्थिक आणि सामाजिक परिणाम दीर्घकालीन असणार आहेत. महागाई, पुरवठा साखळीतील अडथळे, रोजगारावर होणारा परिणाम या सर्वांचा थेट फटका सामान्य नागरिकांना बसणार आहे. अशा वेळी सरकारची तत्परता, दूरदृष्टी आणि प्रभावी अंमलबजावणी यावरच जनतेचा त्रास किती कमी होईल, हे अवलंबून आहे. पंतप्रधानांच्या भाषणातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे आंतरराष्ट्रीय संदर्भातील मौन. संपूर्ण भाषणात इस्रायल, अमेरिका किंवा इराण यांचा थेट उल्लेख टाळण्यात आला. या युद्धामागील जागतिक राजकारणावर भाष्य न करणे, ही जाणीवपूर्वक घेतलेली भूमिका असू शकते; मात्र त्यामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणाविषयी प्रश्न उपस्थित होतात. अशा जागतिक संकटात भारताची भूमिका नेमकी काय आहे, हे स्पष्ट होणे गरजेचे आहे. एकूणच, या भाषणातून जनतेला ठोस दिलासा मिळण्याऐवजी अनिश्चिततेची भावना अधिक तीव्र झाली आहे. आश्वासनांपेक्षा कृती, घोषणांपेक्षा पारदर्शकता आणि शब्दांपेक्षा परिणामकारक उपाययोजना या गोष्टींची आज देशाला अधिक गरज आहे. युद्धाच्या सावटाखाली उभ्या असलेल्या या आव्हानात्मक काळात सरकारने केवळ परिस्थितीचे वर्णन न करता, तिचा प्रभावी सामना करण्याची ठोस क्षमता दाखवणे अत्यावश्यक आहे.

## महसूल विभागाचा अवैध गौण खनिज माफियांना दणका; दोदडगाव शिवारात छापा टाकून गुन्हा दाखल

अंबड । प्रतिनिधी

**तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन आणि उपसा करणाऱ्यांविरुद्ध महसूल विभागाने आपली मोहीम अधिक तीव्र केली आहे. तालुक्यातील मौजे दोदडगाव येथे अवैध मुरूम उत्खनन करणाऱ्यांवर छापा टाकून, शासकीय आदेशाचे उल्लंघन आणि चोरी केल्याप्रकरणी गोंडी पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा () दाखल करण्यात आला आहे.**

दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजेच्या सुमारास, दोदडगाव सजाचे ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) विशाल वैजिनाथ अनारुपे आणि वडीकाळ्या सजाचे तलाठी पवन तुपकर यांना गोपनीय माहिती मिळाली की, दोदडगाव शिवारातील शेत गट क्र. २३१ मध्ये विनापरवाना अवैध मुरूम उत्खनन सुरू आहे. माहिती मिळताच पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी तेथे एक पिवळ्या रंगाचा जेसीबी आणि हायवा (क्र. ४४ ९४९५) मुरूम उत्खनन करताना आढळून आले. महसूल पथकाचा सुगावा लागताच वाहन चालक राम घाडगे याने पथकाचा आदेश न मानता वाहन पळवून नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, पथकाने या संपूर्ण प्रकाराचा पंचनामा करून पोलीस प्रशासनाकडे रीतसर तक्रार दाखल केली. दाखल करण्यात आलेली कलमे आणि दंड या प्रकरणी आरोपी राम घाडगे विरुद्ध खालील कायद्यान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे: भारतीय न्याय संहिता (), २०२३: कलम ३०३(२) (चोरी) आणि २२३ (लोकसेवकाच्या आदेशाची अवज्ञा). महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६: कलम ४८(७) व ४८(८) अन्वये दंडात्मक कारवाई. खाण आणि खनिज अधिनियम, १९५७: कलम ४ व २१. सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम, १९८४: कलम ३. अंदाजे २५ ते ३० ब्रास मुरुमाचे अवैध उत्खनन केल्याचे निष्पन्न झाले असून, यापूर्वीच दंडात्मक कारवाईची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. वरिष्ठ प्रशासनाचे मार्गदर्शन व नेतृत्व: सदर धडक कारवाई जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, आणि उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. यामध्ये तलाठी विशाल अनारुपे, पवन तुपकर व मंडळ अधिकारी यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. तहसीलदारांचा कडक इशारा आणि आवाहन: अंबड तालुक्यात कोणत्याही स्वरूपाचे अवैध उत्खनन खपवून घेतले जाणार नाही. सर्व अवैध उत्खनन करणाऱ्यांना सूचित करण्यात येते की, विनापरवाना गौण खनिजाचा उपसा केल्यास त्यांच्यावर कडक फौजदारी आणि दंडात्मक कारवाई केली जाईल. नागरिकांनी आणि व्यावसायिकांनी नियमांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे,'' असे आवाहन तहसीलदार विजय चव्हाण यांनी केले आहे.

## पेट्रोल डिझेल सुरळी सुरू अफावर विश्वास ठेवू नका; गर्दीवर नियंत्रणासाठी प्रशासनाचा आदेश

जालना । प्रतिनिधी

**जालना जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही समाजमाध्यमांवर पसरलेल्या अफवांमुळे नागरिकांकडून पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी होत असून, ठिकठिकाणी लांबच लांब रांगा लागल्या आहेत. त्यामुळे मागणी व पुरवठा यामध्ये तात्पुरता असमतोल निर्माण झाल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे.**

या पार्श्वभूमीवर, सार्वजनिक हित लक्षात घेऊन व इंधनाचा सुरळीत पुरवठा कायम राखण्यासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना यांनी जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून तातडीचे निर्बंध लागू केले आहेत. नवीन आदेशानुसार, दुचाकी वाहनांसाठी जास्तीत जास्त २०० रुपयांपर्यंतच इंधन देण्यात येणार असून, तीनचाकी व चारचाकी वाहनांसाठी ही मर्यादा २००० रुपये निश्चित करण्यात आली आहे. तसेच कॅन, बाटल्या किंवा ड्रममध्ये इंधन देण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. प्रशासनाने नागरिकांना अनावश्यक गर्दी टाळून केवळ आवश्यकतेनुसारच इंधन घेण्याचे आवाहन केले आहे. रुग्णवाहिका व अत्यावश्यक सेवांशी संबंधित वाहनांना प्राधान्याने इंधन पुरवठा करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. याशिवाय, प्रत्येक पेट्रोल पंपावर दररोज उपलब्ध साठा, प्राप्त साठा व मागणी केलेला साठा याची माहिती दर्शनी भागात फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व पेट्रोल पंप चालकांनी या आदेशाचे काटेकोर पालन करणे आवश्यक असून, उल्लंघन करणाऱ्यांवर जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. सदर आदेश तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आला असून, पुढील आदेशापर्यंत तो लागू राहणार आहे.

## शिक्षणमंत्री ना.दादा भुसे यांनी साधला आयडॉल शिक्षकांशी संवाद

### आदर्श पुरस्कारपाप्त शिक्षिका शोभा दळवींनी घेतला सहभाग




बीड । प्रतिनिधी

**राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी रविवार दि. २२ मार्च २०२६ रोजी पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गरदरेवाडी येथील भेटी दरम्यान राज्यातील २०० आयडॉल शिक्षक यांच्यासोबत शैक्षणिक गुणवत्तावाढी अंतर्गत संवाद साधला.**

शासकीय शाळेतील पटसंख्या वाढविणे सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास बीड जिल्हास्तरावरील गुणानुक्रमे सहा आयडॉल शिक्षकांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्याची संधी मिळाली. यामध्ये माध्यमिक शाळा, उमापूर ता.गेवराई येथे कार्यरत असणाऱ्या आदर्श व आयडॉल शिक्षिका श्रीम. शोभा दळवी या कार्यक्रमास उपस्थित व सक्रिय सहभागी होत्या. या कार्यक्रमात मंत्री महोदय यांनी 'गुढीपाडवा, पट वाढवा' हे राज्यस्तरीय अभियान सुरू केले. पटसंख्या वाढणे आणि शाळा टिकवणे, ही काळाची गरज आहे, असे ते यावेळी म्हणाले. 'राष्ट्रप्रथम' ही संकल्पना देखील त्यांनी मांडली. शिक्षक,विद्यार्थी आणि शाळा यांच्या हिताचे निर्णय घेतले जातील, असे मंत्री महोदयानी विचार व्यक्त केले. या कार्यक्रमास पुणे जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

## भायाळा येथील नारळी सप्ताह; महामंडलेश्वर स्वामी त्रिविक्रमानंद सरस्वती सरस्वतीजींच्या कीर्तनाने सांगता

बीड । प्रतिनिधी



पाटोदा तालुक्यातील भायाळा येथे संतश्रेष्ठ वै. १०८ स्वामी गणेशानंद सरस्वती जी महाराज यांच्या आशीर्वादाने आणि महामंडलेश्वर स्वामी १००८ त्रिविक्रमानंद सरस्वती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली नारळी सप्ताह सुरू आहे. या नारळी अखंड हरिनाम सप्ताह व १० कोटी नामजप महायज्ञाच्या सोहळ्याची सांगता शुक्रवार दि.२७ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळात काल्याचे किर्तन आणि त्यानंतर महाप्रसादाने होणार आहे. या नारळी सप्ताहास अलोट गर्दी आहे. महामंडलेश्वर स्वामी त्रिवेकानंद त्रिविक्रमानंद सरस्वतीजी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनास व महाप्रसादास उपस्थित राहण्याचे आवाहन भायाळा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## तालखेड वीजप्रश्नावर तोडगा; लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे

माजलगाव । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील मौजे तालखेड येथे गेल्या एक ते दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या वीजपुरवठा समस्येमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी छेडलेले आमरण उपोषण अखेर मागे घेतले आहे. महावितरणकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला.**

तालखेड येथे वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले होते. वीजबिल वसुलीत आघाडीवर असूनही तसेच वीज चोरीचे प्रमाण शून्य असतानाही अपुरा वीजपुरवठा मिळत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती.



यावर तोडगा न निघाल्याने २५ मार्च २०२६ पासून आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते. या उपोषणात कैलास मोरे, गुलाबराव मोरे, पंडित ओव्हाळ, रेवन यादव, दिनकर रिंगणे, राजाभाऊ परदेशी, नितेश खोटे, फरिद पठाण, वैभव मोरे, अनिल गायकवाड, सोपानराव वीर, आबासाहेब मोरे, रमेश शेंडगे, दयानंद जाधव आदी ग्रामस्थ सहभागी झाले होते. ग्रामपंचायत तालखेडच्या वतीने सरपंच सौ. गितांजली गुलाब मोरे, उपसरपंच श्री. पंडित बन्सी ओव्हाळ, ग्रामविकास अधिकारी श्री. सुग्रीव भारत भारती व सदस्यांनी उपविभागीय अभियंत्यांना निवेदन देत तातडीने वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली होती. उपोषणादरम्यान महावितरण विभाग व ग्रामस्थ यांच्यात बैठक घेण्यात आली. यामध्ये माजलगाव उपविभागातील ३३ केव्ही मालीपारगाव वाहिनीवर अतिरिक्त भार पडत असल्यामुळे वारंवार वीज खंडित होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. समस्येच्या कायमस्वरूपी तोडग्यासाठी २.० योजनेअंतर्गत नवीन ३३ केव्ही लिंक लाईन मंजूर करण्यात आली असून दोन उपकेंद्रांचे विभाजन करण्यात येणार आहे. आवश्यक साहित्य १० ते १२ दिवसांत उपलब्ध करून अंदाजे १५ दिवसांत काम पूर्ण केले जाईल, असे लेखी आश्वासन महावितरणकडून देण्यात आले. दरम्यान, विजय दादा साळवे यांनी दोन्ही बाजूंमध्ये समन्वय साधत महत्त्वाची मध्यस्थी केली. त्यांच्या प्रयत्नांमुळे ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेत प्रशासनाला सहकार्य करण्याचा निर्णय घेतला. तथापि, दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास पुन्हा आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला असून आता महावितरणच्या कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पाटोदा महावितरणचा बेजबाबदार कारभार; रात्री लाईट गायब, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे फोन बंद

पाटोदा । प्रतिनिधी

**पाटोदा शहरात महावितरणच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर अधिकारी व कर्मचाऱ्यांचे फोन बंद असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.**

शहरातील बसस्थानक परिसरात काल रात्री अचानक वीजपुरवठा खंडित झाला. यामुळे नागरिकांना संपूर्ण रात्र अंधारात काढावी लागली. उष्णतेमुळे लहान मुले, वृद्ध तसेच रुग्णांना विशेष त्रास सहन करावा लागला.ङ्गङ्गवीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी नागरिकांनी वारंवार संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, अनेकांचे फोन बंद असल्याने कोणतीही मदत मिळू शकली नाही. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी नेमके कोणाशी संपर्क साधायचा, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. महावितरणकडून तातडीची सेवा मिळत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना वाढीस लागली आहे. ''रात्रीच्या वेळी वीज गेल्यास किमान तक्रार नोंदवण्यासाठी तरी संपर्क उपलब्ध असावा,'' अशी मागणी स्थानिकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, प्रशासनाने या प्रकाराची तातडीने दखल घेऊन वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांनी २४ तास संपर्कात राहून नागरिकांना सेवा द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## पान १ वरून...



### शेतात पिके आडवी,

गंभीर बनली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी प्रशासनाला तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई जाहीर करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून यंत्रणा कार्यान्वित करावी, अन्यथा शेतकऱ्यांचा संताप उफाळून येण्याची शक्यता नाकारता येत नाही. गारपिटीमुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना प्रशासनाच्या दिरंगाईचा दुहेरी फटका बसत आहे. तातडीने मदत मिळाली नाही, तर अनेक शेतकऱ्यांची आर्थिक घडी पूर्णपणे विस्कटण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने वेळीच निर्णय घेऊन मदत पोहोचवणे अत्यंत गरजेचे बनले आहे.

----------

### रेशनकार्डधारकांना

केरोसीन वितरण निश्चित करण्यात आले आहे. मार्च–एप्रिल २०२६ मध्ये केरोसीन वाटप राज्यात तिन्ही तेल कंपन्यांकडून केले जाणार आहे. इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या कंपन्यांद्वारे केरोसीन दिले जाणार आहे. एकूण वाटपाच्या ८५ टक्के केरोसीन पहिल्या पंधरा दिवसांत सोडण्याचे राज्य सरकारचे आदेश आहेत. शिधापत्रिका असलेल्या ३ लिटर केरोसीन मिळणार आहे. त्याचसोबत ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही अशा कुटुंबांनादेखील केरोसीन मिळणार आहे. प्रतिसादाच्या अनुषंगाने श्वेतपत्रिकाधारक केरोसीन मिळवण्यासाठी पात्र असतील. प्रत्येक जिल्ह्यात केरोसीन पाठवले जाणार आहे. त्यानंतर ते नागरिकांपर्यंत पुरवले जाणार आहे. हिंगोली जिल्ह्यात केरोसीन दाखल देखील झाले आहे. हे केरोसीन शिधापत्रिकाधारकांमध्ये वाटण्यास सुरुवात केली आहे.

---------

### देणगीपोटी भाजपला एका वर्षात

पार्टीने मोठा खुलासा केला आहे. २० हजार रुपयांपेक्षा जास्त एकही देणगी मिळाली नाही.पक्षाकडून गेल्या १९ वर्षांपासून कमी रुपयांची देणगी स्वीकारली जाते. एकूण देणग्यांमध्ये आधीच्या वर्षाच्या तुलनेत २०२४–२५ मध्ये ४ हजार १०४ कोटींची वाढ झाली आहे. यात फक्त भाजपच्याच देणगींमध्ये १७१ टक्क्यांची वाढ झाली. भाजपला २०२३–२४ मध्ये २२४३ कोटी रुपये मिळाले होते. तर काँग्रेसच्या देणगीत ८४ टक्के वाढ झाली. आम आदमी पार्टीला २७.०४ कोटी रुपये मिळाले आहेत. तर एनपीपीला १.९४ कोटी रुपये देणगी मिळाली आहे. कॉर्पोरेट देणगी ६ हजार १२८.७८ कोटी रुपये इतकी आहे. यात ३ हजार २४४ जणांकडून देणगी दिली गेलीय. तर वैयक्तिक देणगी ५०५.६६ कोटी रुपये आहे. ७ हजार ९०० जणांनी ही देणगी दिली आहे. भाजपला सर्वाधिक कॉर्पोरेट सेक्टरमधून तब्बल ५ हजार ७१७ कोटी रुपये मिळाले आहेत. यात सिरम इन्स्टिट्यूटने १०० कोटी तर कडून ९५ कोटी रुपये भाजपला देण्यात आलेत. देशात राजकीय देणग्यांमधील सर्वात मोठ्या देणग्या कॉर्पोरेट सेक्टरमधून येतात आणि यामध्ये भाजपला सर्वाधिक देणग्या मिळाल्या आहेत.

----------

### ...तर परतीचा कोणताही मार्ग

करत आहेत. ते लष्करीदृष्ट्या उद्ध्वस्त झाले आहेत. त्यांच्या पुनरागमनाची कोणतीही शक्यता नाही. असे असूनही ते जाहीरपणे सांगत आहेत की ते फक्त आमच्या प्रस्तावाचा विचार करत आहेत. हे पूर्णपणे चुकीचे आहे. वेळ संपण्यापूर्वी त्यांनी गांभीर्य दाखवलेले बरे, कारण एकदा का वेळ निघून गेली की परतीचा कोणताही मार्ग उरणार नाही आणि त्याचे परिणाम भयानक असतील, अशा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. दरम्यान, पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री दिलेल्या माहितीनुसार, अमेरिका आणि इराणमध्ये पाकिस्तानमार्फत अप्रत्यक्ष चर्चा सुरू आहे, तर तुर्की आणि इजिप्त देखील मध्यस्थ म्हणून प्रयत्न करत आहेत.

------------

### खरात प्रकरणात नवा खुलासा

अशोक खरात याच्यावर नाशिक पोलिसांत ८ गुन्हे दाखल आहेत. तर वावी पोलिस ठाण्यात त्याने दिनेश परब आणि राजेंद्र जासूद यांच्याविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल केला होता. शिर्डी पोलिसांत त्याच्या ऑफिस बॉयविरुद्ध एक गुन्हा दाखल आहे. हे सर्व गुन्हे एकमेकांशी संबंधित असल्याने, सर्व प्रकरणांचा एकत्रित तपास एसआयटीच्या माध्यमातून करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एसआयटी टीमने नाशिक क्राईम ब्रँचकडून डीव्हीआर, सीसीटीव्ही फुटेज, लॅपटॉप, कागदपत्रे यासह सर्व महत्त्वाचे मुद्देमाल ताब्यात घेतला आहे. आता या सर्व पुराव्यांचा सखोल अभ्यास करून एकत्रित तपास सुरू होणार आहे. अशोक खरातकडून जप्त करण्यात आलेल्या बंदुकीचा परवाना नाशिक जिल्हा प्रशासनानेच दिल्याचे उघड झाले आहे. १५ ऑक्टोबर २०१२ रोजी हा शस्त्र परवाना मंजूर झाला होता, तर १ जानेवारी २०२४ रोजी त्याचे नूतनीकरण करण्यात आले होते. त्याच्या फार्महाऊसवरून २१ काडतुसे जप्त करण्यात आल्या आहेत. त्यापैकी ५ काडतुसे वापरलेल्या आहेत. या काडतुसांचा नेमका वापर कशासाठी झाला, याचा तपास सुरू आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीनंतरच हा परवाना देण्यात आला होता. आता बंदुकीचा परवाना रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, अशोक खरातच्या शिवानिका संस्थांच्या सर्व बँक खात्यांवर सील लावण्यात आले आहे. विशेष तपास पथकाने खरात आणि त्याच्या कुटुंबीयांच्या नावावर असलेल्या जमीन, घर, दुकाने यांची माहिती मागवली आहे. नोंदणी विभागाकडून राज्यभरातील मालमत्तेचा शोध घेतला जात आहे. कोट्यवधी रुपयांची आर्थिक माया उघड होण्याची शक्यता आहे. मालमत्ता खरेदीसाठी पैसा कुठून आला, याचा सखोल तपास केला जाणार आहे.

-----------

### इतिहासकार संशोधक डॉ.जयसिंगराव

२५ हून अधिक ग्रंथ लिहिले. विविध इतिहास परिषदा आणि संशोधन नियतकालिकांमध्ये त्यांचे ४५ हून अधिक शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे ते संस्थापक सदस्य होते. त्यांनी या परिषदेचे तीन वर्षे अध्यक्षपदही भूषविले. ज्यांच्या व्यासंग आणि संशोधनपूर्ण मांडणीमुळे नव्या पिढीसाठी शिव–शाहू चरित्रांचा अमुल्य असा ठेवा उपलब्ध झाला. अशा डॉ जयसिंगराव पवार यांच्या निधनामुळे आपण इतिहास संशोधन क्षेत्रातील तत्वनिष्ठ, व्यासंगी मार्गदर्शकाला मुकलो आहोत, अशी शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. जयसिंगराव पवार यांना श्रद्धांजली वाहिली आहे. त्यांच्या जाण्याची बातमी मनाला चटका लावणारी आहे. इतिहासाचा केवळ अभ्यास न करता तो जिवंत ठेवण्याचे कार्य त्यांनी आयुष्यभर केले. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, छत्रपती संभाजी महाराज, जिजाऊ माँसाहेब, महाराणी ताराराणी आणि इतर थोर व्यक्तिमत्त्वांचा त्यांनी घेतलेला सखोल वेध पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. शाहू संशोधन केंद्राच्या माध्यमातून त्यांनी इतिहास लेखनाला नवी दिशा दिली. त्यांच्या संशोधनातून आणि लेखनातून महाराष्ट्राच्या इतिहासाला एक समृद्ध, संदर्भपूर्ण भक्कम पाया मिळाला. असा तत्वनिष्ठ, व्यासंगी आणि शांतपणे मोठं काम करणारा संशोधक हरपणं ही राज्यासाठी मोठी पोकळी आहे, असे फडणवीस यांनी शोकसंदेशात म्हटले आहे. डॉ. जयसिंगराव पवार यांनी आयुष्यभर महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास लोकांसमोर मांडण्याचे काम केले. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर त्यांनी केलेले संशोधन मार्गदर्शक ठरले आहे. त्यांच्या निधनामुळे ऐतिहासिक संशोधन क्षेत्राची कधीही भरून न येणारी हानी झाली आहे, अशा भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केल्या आहेत. डॉ. जयसिंगराव पवार यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद असून महाराष्ट्रासाठी ही मोठी हानी आहे. मराठेशाहीचा खरा इतिहास जगासमोर आणणारा शाहू विचारांचा इतिहासकार हरपला, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

----------

### धार्मिक सणांसाठी सार्वजनिक सुट्टी

प्राधान्य देणे गरजेचे असल्याचेही न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने नमूद केले. गुरु गोविंद सिंग यांची जयंती (प्रकाश पर्व) ही देशभरात राजपत्रित सुट्टी म्हणून जाहीर करावी आणि देशभरातील सार्वजनिक सुट्ट्या जाहीर करण्याबाबत एकसमान मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत, अशी मागणी करणारी याचिका ऑल इंडिया शिरोमणी सिंह सभा या संस्थेने दाखल केली होती. यावर न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

-------------

### नेते,भोंदू बुवा, अन 'त्या'

पण त्याने असे चाळे केले तर जनतेने यांना आपला नेता कसे म्हणावे हा देखील मोठा प्रश्न आहे. यापूर्वी मोठमोठ्या महाराजांचे असेच लफड्याचे किस्से पुढे आलेले आहेत, त्यात आसाराम बापू, राम रहीम, सध्या जेलची हवा खात आहेत. त्यांचेही व्हिडिओ असेच व्हायरल झाले होते. आता खरात याचे आयुष्य जेलमध्ये जाईल यात शंका नाही. पण नेतेमंडळी, राजकारणी लोक यांचे आलेले व्हिडिओ पाहतात. त्यांचे करिअर काय असावे हा त्यांचा वैयक्तिक भाग झाला, परंतु जनतेला आता त्यांना नावे ठेवण्यापेक्षा आणखी त्यांची कोणकोणते व्हिडिओ बाहेर येतात याचीच उत्सुकता किमान सोशल मीडियावर तरी आहे. या सर्व कारणामुळे द डर्टी पिक्चर देखील फिका पडला असेच म्हणावे लागेल.

----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. २७ मार्च २०२६



# परळीत श्रीराम जन्मोत्सव सोहळा

## प्राचीन काळाराम, सावळाराम मंदिरात घेतले दर्शन ;परळीत रामराज्यासाठी दिल्या शुभेच्छा!

परळी । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील धार्मिक महत्त्व असलेल्या ऐतिहासिक काळाराम व सावळाराम मंदिरात आज श्रीराम जन्मोत्सव मोठया उत्साहात साजरा झाला. जय श्रीराम, जय जय श्रीराम चा जयघोष करत परळीत रामराज्य व्हावे अशा शब्दांत त्यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या.

अंबेवेस भागातील ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेल्या काळाराम मंदिरात आज दुपारी १२ वा. श्रीराम जन्मोत्सव मोठया उत्साहात पार पडला. यावेळी महिला व पुरूषांची उपस्थिती लक्षणीय होती. ना.पंकजाताई मुंडे यांनी





उत्सवात सहभाग घेतला. श्री राम जन्माच्या वेळी पाळण्याची दोरी त्यांच्या हाती देण्यात आली. भाविक महिलांसोबत त्यांनी पाळणाही म्हटला. टाळ, मृदंगाचा गजर आणि संगीताच्या निनादाने वातावरण भारावून गेले होते. आरतीनंतर पंकजाताईंनी श्रीरामाचे मनोभावे दर्शन घेतले. गणेशपार भागातील सावळाराम मंदिरासही त्यांनी भेट देऊन दर्शन घेतले.

यावेळी नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, भाजपचे ज्येष्ठ नेते दत्ताप्पा इटके, जुगलकिशोर लोहिया, शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, डॉ. शालिनीताई कराड, ॲड शुभांगी गिते, नगरसेवक पवन मुंडे, निळकंठ चाटे,महादेव इटके, प्रीतेश तोतला,अरूण पाठक, आश्विन मोगरकर आदींसह असंख्य कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

नेकनूर येथे कालिका देवीचे घेतले दर्शन

बीड कडे जाताना नेकनूर येथे ना. पंकजाताईंनी जागृत देवस्थान कालिका देवीचे दर्शन घेतले. वै. प्रात:स्मरणीय गुरु बंकटस्वामी महाराज यांचे शिष्य वै.ह.भ.प सुदामराव महाराज यांच्या २४ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरीनाम सप्ताहाच्या सांगता सोहळ्यासही त्यांनी भेट दिली. याप्रसंगी प्रभू श्रीराम यांचे दर्शन घेतले. याप्रसंगी उपस्थित भाविकांशी संवाद साधला.

## थोडक्यात

### दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्र पिण्याच्या पाण्याविना; रुग्ण व कर्मचाऱ्यांची गैरसोय

पाटोदा । प्रतिनिधी




दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सध्या पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असून रुग्ण तसेच कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आरोग्य केंद्रात मूलभूत सुविधा नसल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

या संदर्भात वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ग्रामसेवक व सरपंच यांना वारंवार विनंती करूनही अद्याप कोणतीही ठोस व्यवस्था करण्यात आलेली नाही. परिणामी, आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांना पिण्याच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे.

दासखेड गावापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावर हे आरोग्य केंद्र असल्याने तात्काळ मदत मिळणेही कठीण होत आहे. विशेषत: आपत्कालीन परिस्थितीत ही समस्या अधिक गंभीर ठरत आहे. या प्रकरणी संबंधित प्रशासनाने त्वरित लक्ष देऊन पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### शकुंतलाबाई देशमुख यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी



शहरातील भट गल्ली भागातील रहिवाशी असलेल्या शकुंतलाबाई प्रभाकरराव देशमुख/ मोगरेकर वय ९० वर्षे यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थीव देहावर सिंदफणा नदीतिरावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. येथील फ्रेममेकर सुधीर देशमुख, न्यायालयीन कर्मचारी संदीप देशमुख यांच्या त्या आई होत.



### मोठेवाडीत महादेव व पार्वतीचा विवाह सोहळा थाटात

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील लहाना महादेव म्हणून प्रसिद्ध असलेल्या मंदीरात महादेव आणि पार्वती या देवांच्या लग्न सोहळ्याची रेलचेल पाहायला मिळाली. सकाळपासूनच वर व वधू कडील पाहुणे मंडळी लहाना महादेव मंदीरात सकाळपासूनच हजेरी लावत होती. वाजंत्री, मंगलाष्टके सारे काही एखाद्या खऱ्याखुऱ्या लग्नासारखे चित्र या ठिकाणी पाहायला मिळाले. हा लग्नसोहळा साजरा करण्याची परंपरा या गावात शेकडो वर्षापासून स्थानिक हिवरकर या कुटुंबियांनी जोपासली आहे. या लग्न सोहळ्याचा मान हिवरकर परिवाराकडे आहे. अनादी काळापासून हा लग्नसोहळा मोठ्या उत्साहात पार पडतो. यंदाही या लग्न सोहळ्यात मोठेवाडी परिसरातील भाविक उपस्थित होते. यां लग्न सोहळ्यात पुरोहित सुनील( नाना) जोशी,तरुण तरुणी आणि महिलां मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. हा लग्नसोहळा मोठेवाडी येथील जागृत देवस्थान लहाना महादेव मंदिरात दरवर्षी चैत्र महिन्यातील अष्टमीला साजरा करण्यात येतो अशी माहिती या लग्न सोहळ्याचे आयोजक महादेवराव हिवरकर यांनी दिली. या विवाह सोहळ्या प्रसंगी अमृत हिवरकर यांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते. हा लग्न सोहळा यशस्वी करण्यासाठी सुदर्शन हिवरकर, अशोक रासवे,सुनील हिवरकर, चक्रधर हिवरकर, सोमेश्वर हिवरकर,भारत खेत्री,रामभाऊ गरड,विष्णु लेंडाळ, यांच्या सह गावातील नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले.

# गेवराईच्या सांस्कृतिक परंपरेला आर्ट ऑफ फन अकॅडमीने नवसंजीवनी दिली- गीताभाभी पवार

बीड । प्रतिनिधी

गेवराईच्या सांस्कृतिक चळवळीला नवे बळ देणाऱ्या आर्ट ऑफ फन अकॅडमी कौतुकास पात्र ठरत आहे. आर्ट फन अकॅडमीची विद्यार्थ्यांनी केवळ गेवराईच नव्हे तर बीड, नाशिक पुणे आणि मुंबई येथे आपला कलाविष्कार सादर करून घवघवीत यश मिळवले आहे. गेवराईमध्ये नव कलाकरांची पिढी घडवण्याचा वसा हाती घेऊन आर्ट ऑफ फन अकॅडमीने गेवराईच्या सांस्कृतिक परंपरेला नवसंजीवनी दिली आहे असे मत गेवराई नगर पालिका अध्यक्षा सौ गीताभाभी बाळराजे दादा पवार यांनी व्यक्त केले.

सन २०२५-२६ या वर्षातील नृत्य व नाट्य विभागाचा बक्षीस वितरण सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्याचे उद्घाटन गेवराईच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा आदरणीय सौ. गीताभाभी बाळराजे दादा पवार यांच्या हस्ते करण्यात आले. गेल्या पाच वर्षांपासून गेवराईच्या थंडावलेल्या सांस्कृतिक परंपरेला



नवसंजीवनी देत अकॅडमीने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार श्री. सुभाष सुतार यांच्या हस्तेही विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या वेळी बोलताना नगराध्यक्षा सौ. पवार यांनी सांगितले की, ''कलेला वय नसते, त्यामुळे आर्ट ऑफ फन अकॅडमीच्या प्रत्येक उपक्रमात पवार परिवार सदैव पाठीशी राहील.'' तर ज्येष्ठ पत्रकार श्री. सुतार यांनी ''कला मानवाला समृद्ध करते आणि अकॅडमीचा उपक्रम कौतुकास्पद आहे,'' असे मत व्यक्त केले. पालक प्रतिनिधी मुस्कान वादवाणी मॅडम यांनीही अकॅडमीमुळे मुलांमध्ये सकारात्मक बदल झाल्याचे सांगितले.

या सोहळ्यात चौथे विश्व मराठी संमेलन (नाशिक), अतुल परचुरे बाल कला करंडक (पुणे), राज्य बालनाट्य स्पर्धा (बीड), जल्लोष लोककलेचा (मुंबई), इतिहास महाराष्ट्राचा (मुंबई) आणि रंगोत्सव (गेवराई) या विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

ज्ञानदा जोशी, अथश्री देशपांडे, आद्या बोर्डे, आर्या वावरे, मन्नत वादवाणी, प्रांजल टाक, पल्लवी उघडे, काव्या मुंदडा, अन्वी मुंदडा, अवनी खेत्रे, केतकी कवडे, कृष्णली कवडे, स्वरा झेंडेकर, विदिशा जाधव, ऋताक्षी मगर, तन्मयी घाडगे, आरोही वाघमारे, वेदांत दहिवाळ, श्लोक मानधने, वेदांत कोकाटे, श्लोक गायकवाड, अजित सदाफुले, आयुष कांडेकर आणि सिद्धांत निकम या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाने अकॅडमीचे नाव उंचावले. कार्यक्रमाला ज्येष्ठ कलावंत तथा बालरंगभूमी परिषदेचे जिल्हा समन्वयक शाहीर विलास बापू सोनवणे, इको इम्पॅक्ट फाउंडेशनचे संस्थापक रोहन पंडित, पालक प्रतिनिधी निकम मॅडम तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मनिषा मानधने, प्रस्तावना रोहित पुराणिक यांनी मांडली, तर आभार प्रदर्शन राम जोशी सर यांनी केले.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अकॅडमीचे संचालक शिवकुमार सोनवणे, रोहित पुराणिक व विवेक शर्मा यांनी विशेष परिश्रम घेतले. या भव्य सोहळ्यामुळे गेवराईच्या सांस्कृतिक क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना नवा रंगमंच मिळाला आहे.

## पान ६ वरुन...

### जबरी चोरी करणाऱ्या

निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड, यांनी आदेशीत केले होते. यावरुन पोलीस उप निरीक्षक विघ्ने हे त्यांचे पथकासह सदर आरोपीचा शोध घेणे कामी दिनांक २५ मार्च रोजी पोलीस ठाणे केज हद्दीत रवाना झाले होते. आरोपी शोध घेत असतांना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा आरोपी आवेज खाजा शेख रा. कोकीसपीर केज व सोहेल मोहंमद शेख अजिजपुरा केज यांनी केला असुन यातील आरोपी आवेज शेख हा धारुर रोड लगत असलेल्या श्रेया बिअरबार जवळ उभा आहे. यावरुन सदर ठिकाणी जावुन शिताफिने त्यास ताब्यात घेतले त्यास गुन्हे अनुशंगाने विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा त्याचे साथीदारासह केला असल्याचे कबुल केले. आरोपीतांनी सदर गुन्ह्यात वापरलेली मो.सा. किंमती १२००००/- रु हि जप्त करण्यात आली आहे. गुन्ह्यातील चोरलेला मुद्देमाल आरोपी सोहेल शेख याचे ताब्यात असुन आवेज शेख यास ताब्यात घेतल्याची माहिती मिळालेपासुन तो फरार आहे सदर आरोपीचा शोध सुरु आहे. आरोपी आवेज शेख यास पुढील कार्यवाही कामी पो.स्टे.केज यांचे ताब्यात देण्यात आले आहे. आरोपी आवेज खाजा शेख याचे विरुद्ध यापुर्वी जबरी चोरी, खुन, खुनाचा प्रयत्न, चोरी यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत , अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम व पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड स्थानिक गुन्हे शाखा बीड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि महेश विघ्ने, पोह/ महेश जोगदंड, पोह/दिलीप गित्ते, चापोह / गणेश मराडे यांनी केली आहे.

### अवैध वाळुची वाहतुक

फिर्यादी होवून दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द पोलीस ठाणे तलवाडा येथे गुरनं.९१/२०२६ कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत , अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. निलंगेकर साहेब, पोउपनि/अन्नलदास, पोह/सचिन कोरडे, पोअं/विठ्ठल राठोड यांनी केलेली आहे.

### चौसाळा येथे उरूस

या उरूस कार्यक्रम चा व कुस्त्यांचा जंगी फड. चौसाळा परिसरातील मल्लांनी लाभ घ्यावा आव्हान करण्यात आले असून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील अध्यक्ष शैलेश सोनवणे उपाध्यक्ष अरबाज मुलानी सचिव प्रसाद (बाबू )देशमुख कोषाध्यक्ष त्र्यंबक पाटील जोगदंड मार्गदर्शक उपसरपंच अंकुश अण्णा कळसे बळीराम राऊत किशोर ढोकणे पंजाब वाघमारे श्रीकांत शिंदे पवन कुचेकर अकबर जहागीरदार प्रदीप कुचेकर धनंजय जोगदंड प्रवीण सोनवणे अमोल कांबळे ग्रामपंचायत सदस्यसह ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

### पुजा धोंडे यांना

समृद्धी बहुउद्देशीय महिला संस्था, सावित्रीबाई फुले संस्था, श्री संत सावता माळी युवक संघ व जागृती संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा भव्य पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या वेळी सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यास माजी महापौर भगवान फुलसौंदर, ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे, शहर बँकेचे उपाध्यक्ष प्रा. माणिक विधाते, किशोर डागवाले, नगरसेविका आशाताई डागबाले, साहेबराव निधाने, दत्ता जाधव, मंगलताई भुजबळ, सारंग पंधाडे, मच्छिंद्र बनकर, प्रा. सिताराम जाधव, प्रा. अश्विनी जाधव, ॲड. पोपटराव बनकर, जयश्री शिंदे, स्वाती बनकर, ॲड. दिनेश शिंदे, नितीन डागवाले, दर्शन बनकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. पुजा धोंडे यांनी सामाजिक, शैक्षणिक व महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात सातत्याने केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना 'समाजभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्यामुळे समाजातील विविध घटकांना प्रेरणा मिळत असल्याचे मान्यवरांनी यावेळी नमूद केले. दरम्यान, पुजा धोंडे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाल्याबद्दल आष्टी तालुक्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### युसुफवडगांव येथे श्रीराम

की जय असा जयघोष करीत गुलाल पुष्प उधळून राम जन्मोत्सव साजरा करण्यात आला.त्यानंतर गावातून रामचंद्रांची पालखी मिरवणूक काढण्यात आली.मिरवणूक वेशीमध्ये आल्यावर १२ बैलगाड्या एकमेकांना बांधून भाविकांनी भरलेल्या या गाड्या ओढण्याचा कार्यक्रम झाला.गाड्या ओढण्याचा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी गावातील व परिसरातील हजारो नागरिकांनी गर्दी केली होती.यावर्षी मानाच्या गाड्या ओढण्याचा मान रामभक्त गंपु जंगल घायाळ यांना होता.

### रामनवमीच्या पावन पर्वावर

व्यवहारापुरते मर्यादित न राहता, समाजातील गरजूंना मदतीचा हात देणे हीदेखील संस्थेची जबाबदारी असल्याचे या कृतीतून अधोरेखित झाले. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले. ''अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होते,'' अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. काहींनी या उपक्रमाचे कौतुक करत इतर संस्थांनीही यापासून प्रेरणा घेण्याची गरज व्यक्त केली. एकूणच, रामनवमीच्या पावन दिवशी वडवणी येथील भारतीय स्टेट बँक शाखेने राबविलेला हा उपक्रम केवळ फळे व पाण्याचे वाटप नसून, मानवतेचा जिव्हाळा आणि सामाजिक बांधिलकी यांचे जिवंत उदाहरण ठरला आहे.

# पिंपळेश्वर महादेव मंदिरातील ५१ फूट उंच कलश कामाचा शुभारंभ उत्साहात

आष्टी । प्रतिनिधी

शहरातील जागृत देवस्थान म्हणून ओळख असलेल्या पिंपळेश्वर महादेव मंदिर येथे ५१ फूट उंचीच्या भव्य कलश कामाचा शुभारंभ आमदार सुरेश आण्णा धस यांच्या शुभहस्ते रामनवमीच्या पवित्र मुहूर्तावर उत्साहात पार पडला.



पिंपळेश्वर देवस्थानचे अध्यक्ष असलेल्या आमदार धस यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर परिसरात विविध विकासकामे सुरू असून, त्यामध्ये या भव्य कलश उभारणीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. यावेळी बोलताना आमदार धस यांनी सांगितले की, गोरगरिबांच्या मुला-मुलींचे विवाह सोहळे कमी खर्चात पार पडावेत यासाठी मंदिर परिसरात मंगल कार्यालयाचे काम सुरू असून ते सध्या प्रगतीपथावर आहे. तसेच भाविक भक्तांच्या सोयीसाठी येथे ''नमो गार्डन'' उभारण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे.

या शुभारंभ सोहळ्याला व्यापारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय शेठ मेहेर, संतोष भैय्या चव्हाण, देवस्थानचे सचिव संजय मुळे, सदस्य सहस्त्रबुद्धे, लक्ष्मण रेडेकर सर, माजी नगराध्यक्ष रंगनाथ अण्णा धोंडे, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, ॲड. बाळासाहेब मोरे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. आष्टी शहरासह पंचक्रोशीतील गावांमधील भाविक भक्तांनी या ५१ फूट उंच कलश उभारणीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन आमदार धस यांनी केले. तसेच परंपरेनुसार गावातील महिला भगिनींचाही या कार्यात सहभाग असतो, त्यामुळे त्यांनाही या उपक्रमाची माहिती देऊन सहभागी करून घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या भव्य कलश उभारणीमुळे पिंपळेश्वर महादेव मंदिराच्या वैभवात अधिक भर पडणार असून भाविकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# पाटोदा तालुक्यातील समविचारी पक्षांचे ९ एप्रिल रोजी होणार धरणे आंदोलन

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील सर्व समविचारी पक्षांची दि. २३ मार्च २०२६ रोजी शासकीय विश्रामगृह येथे बैठक पार पडली, यावेळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) , शिवसेना (उ.बा.ठा.), वंचित बहुजन आघाडी, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, भारतीय शेतकरी कामगार पक्ष, बहुजन समाज पार्टी, जनशक्ती शेतकरी संघटना इ. पक्षांचे नेते व कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते, सदर बैठकीत एकमताने ''शेतकरी व जनतेच्या विविध मागण्यांसाठी सर्व समविचारी पक्षांनी मिळुन मा. उप विभागीय अधिकारी साहेब, पाटोदा यांचे कार्यालयासमोर दि. ०९ एप्रिल २०२६ रोजी धरने आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला.



दि. २५ मार्च २०२६ रोजी पाटोदा तालुक्यातील सर्व समविचारी पक्षांचे नेते मंडळींनी मा. उप विभागीय अधिकारी साहेब पाटोदा यांना लेखी निवेदन देऊन दि. ०९ एप्रिल २०२६ रोजी शेतकरी व जनतेच्या एकुण १९ मागण्यांसह लेखी निवेदन दिले आहे, सदर निवेदनातील प्रमुख मागण्या ''महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांची कुठल्याही अटी व शर्ती न लादता सरसकट कर्जमाफी करण्यात यावी व सर्व शेतकऱ्यांचे सात बारा चे उतारे कोरे करण्यात यावेत,सन २०२०,२०२५ रोजीचा पुर्ण खरीप पीक विमा तसेच सन २०२३-२४ चा राहिलेला ७५ टक्के पीक विमा देण्यात यावा, '' इ. मागण्यांसह एकुण १९ मागण्यांसह सदर धरने आंदोलन करण्यात येणार आहे.

दि. २५ मार्च २०२६ रोजी मा. उप विभागीय अधिकारी साहेब पाटोदा यांना लेखी निवेदन देण्यासाठी कम्युनिस्ट पक्षाचे जेष्ठ नेते कॉम्रेड महादेव नागरगोजे, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ नेते भाई विष्णुपंत घोलप, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हा सरचिटणीस शिवभुषण जाधव, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे जिल्हा चिटणीस अँड. विशाल मस्के, वंचित बहुजन आघाडी चे जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर, जनशक्ती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र खाडे,भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव, शिवसेना (उ.बा.ठा.) पक्षाचे तालुका प्रमुख मुकुंद शिंदे, वंचित बहुजन आघाडी चे तालुका अध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (श.प) चे तालुका कार्याध्यक्ष गणेश कवडे, तसेच शिवसेना (उ.बा.ठा.) पक्षाचे आकाश कांकरीया, बहुजन समाज पार्टी चे विष्णुपंत गाडेकर, तसेच अजिंक्य डोरले, इलियास भाई, स्वप्निल राजगुरू, सय्यद वहाब यांचेसह इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिराळमध्ये नारी शक्तीचा भक्तीरूपी जागर ;अखंड हरिनाम सप्ताह व कीर्तन महोत्सव दिमाखात सुरु

## यंदाचे कीर्तनकार, प्रवचनकार ते पखवाज-टाळकरी..सप्ताहाची संपूर्ण धुरा महिलांच्या खांद्यावर

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील अध्यात्मिक परंपरा आणि वारकरी संप्रदायाचा प्रदीर्घ वारसा जपणारे क्षेत्र शिराळ पुन्हा एकदा भक्तीच्या सागरात डुंबून गेले आहे. वै. ह.भ.प.श्री. चींभळेकर महाराज (बाबा) यांच्या कृपाशीर्वादाने आणि प्रेरणेतून शिराळ येथे दरवर्षाप्रमाणे यंदाही भव्य अखंड हरिनाम सप्ताह, कीर्तन महोत्सव, वाल्मीकी रामायण पारायण आणि लक्ष्मण शक्ती सोहळा मोठ्या उत्साहात सुरू आहे. दि.१९ ते २६ मार्च २०२६ या कालावधीत चालणाऱ्या या सप्ताहाचे यंदाचे सर्वात मोठे व कौतुकास्पद वैशिष्ट्य म्हणजे, हा महोत्सव नारी शक्ती सन्मान सोहळा २०२६ म्हणून साजरा केला जात आहे.

भक्ती आणि शक्तीचा अद्भुत संगम

शिराळकर यंदा भक्ती आणि शक्तीचा एक अद्भुत संगम अनुभवत आहेत.या महोत्सवात सर्व प्रमुख सेवा,कीर्तन आणि प्रवचनाची धुरा महिलांनी अत्यंत समर्थपणे सांभाळली आहे. विशेष म्हणजे कीर्तनकार आणि प्रवचनकारांसोबतच साथसंगत करणारे टाळकरी आणि पखवाज वादकही सर्व महिलाच आहेत. महाराष्ट्रातील नामवंत महिला कीर्तनकार आपल्या रसाळ वाणीतून समाज प्रबोधन करत असल्याने परिसरातील भाविकांची मोठी गर्दी



उसळत आहे.

आतापर्यंत ह.भ.प. प्रतिक्षाताई करडुळे, ह.भ.प.दिपालीताई खिळे, ह.भ.प. वणीताताई पाटील, ह.भ.प. शालिनीताई देशमुख इंदोरीकर आणि ह.भ.प. आरतीताई शिंगोळे यांची प्रबोधनपर हरिकीर्तने पार पडली आहेत.तर आज मंगळवारी ह.भ.प. साध्वी आरतीताई शिंदे यांचे,तर बुधवारी ह.भ.प.कांचनताई जगताप यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे.

प्रवचन सेवेमध्ये ह.भ.प.पुष्पाताई तावरे, ह.भ.प. दिपालीताई कोकाटे, ह.भ.प. वेदीकाताई तावरे आणि ह.भ.प. शारदाताई हवालधर यांनी भाविकांना मंत्रमुग्ध केले.आज मंगळवारी ह.भ.प. लताताई चव्हाण तर बुधवारी ह.भ.प. माधुरीताई बनसोडे यांचे प्रवचन होणार आहे.

दैनंदिन कार्यक्रमांची रेलचेल

सप्ताहाच्या काळात शिराळनगरीला अक्षरश: पंढरपूरचे स्वरूप आले आहे. दररोज पहाटे काकडा आरती, भजन,रामविजय ग्रंथ वाचन,दुपारचे प्रवचन, सायंकाळी संगीत हरिपाठ आणि रात्री ९ ते ११ या वेळेत सुप्रसिद्ध कीर्तनकारांची भव्य कीर्तने असा भरगच्च कार्यक्रम सुरू आहे. रात्री ११ नंतर चालणाऱ्या पारंपारिक हरिजागराने भक्तीमय वातावरणात अधिकच भर घातली आहे.

रामनवमीला काल्याचे कीर्तन आणि ऐतिहासिक लक्ष्मण शक्ती सोहळा या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता आणि कळसाध्याय गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी रामनवमीच्या मुहूर्तावर होणार आहे. सकाळी ९:३० ते ११:३० या वेळेत भागवताचार्य ह.भ.प.साध्वी सोनाली दीदी करपे यांचे रामजन्मोत्सव आणि काल्याचे कीर्तन होईल. यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहाचे आणखी एक मुख्य आकर्षण असलेला भव्य आणि ऐतिहासिक लक्ष्मण शक्ती सोहळा रात्री ८ ते पहाटे ६ वाजेपर्यंत रात्रभर चालणार आहे. या पारंपारिक सोहळ्याची पंचक्रोशीत मोठी उत्सुकता असून, यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे.

भाविकांना आवाहान

शिराळ आणि परिसरातील सर्व आबालवृद्ध भाविकांनी, तसेच माता-भगिनींनी या अभूतपूर्व नारी शक्ती सन्मान सोहळा आणि अखंड हरिनाम सप्ताहास मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक मंडळी आणि समस्त ग्रामस्थ, शिराळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# चार एकर गव्हाची झाली राखरांगोळी, शेतकऱ्याने फोडला टाहो

## परभणीतील शेतकऱ्याला मोठा फटका

परभणी । प्रतिनिधी

जिल्ह्यातील मांडाखळी गावामध्ये धक्कादायक घटना घडली आहे. शेतकऱ्याच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरावला आहे. शॉर्टसर्किट झाल्यामुळं डोळ्यादेखत चार एकर गहू जळून खाक झाला आहे. या घटनेनंतर शेतकऱ्यांने टाहो फोडल्याचं पाहायला मिळालं. शेतकऱ्याला मोठा आर्थिक फटका बसला आहे.

शेतातून गेलेल्या महावितरणच्या तारांमध्ये घर्षण होऊन शॉर्टसर्किट झाल्यामुळं लागली आग परभणीच्या मांडाखळी गावामध्ये अत्यंत मनाला वेदना देणारी घटना घडली आहे. मांडाखळी येथील शेतकरी रुस्तुम निवृत्ती शिराळ यांचा चार एकर गहू डोळ्यासमोर जळून खाक झाला आहे. हे चित्र पाहून शेतकऱ्यांने टाहो फोडला. शेतातून गेलेल्या महावितरणच्या तारांमध्ये घर्षण होऊन शॉर्टसर्किट झालं आणि या गव्हाला आग लागली. ही आग





भीषण होती. मोठ्या प्रमाणावर आगीचे लोट पसरले आहेत. तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेल्या गव्हाला अशा पद्धतीने आग लागल्याने शेतकऱ्यांच मोठं आर्थि नुकसान झालं असून या घटनेने सर्व गाव हळहळले आहे.

डोळ्यादेखत चार एकर गहू जळून खाक झाल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आधीच राज्यातील शेतकरी संकटात आगहेत. एका बाजूला आस्मान संकट आहे तर दुसऱ्या बाजूला सुलतानी संकट आहे. अशातच अचानक येणाऱ्या संकटाचा देखील मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. सध्या शेतमाला चांगला दर मिळत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. तसेच कर्जबाजारीपणा आणि नापीकीला कंटाळून राज्यात अनेक शेतकरी आत्महत्या करत आहेत. विशेषत मराठवाडा आणि विदर्भात मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या होत असल्याचे चित्र दिसत आहे.

# डाळिंबाची सुधारित लागवड पद्धत

डाळिंब हे भारतातील एक महत्त्वाचे फळ पीक आहे. त्याचा उगम इराणमध्ये झाला आणि स्पेन, मोरोक्को, इजिप्त, इराण, अफगाणिस्तान आणि बलुचिस्तान यांसारख्या भूमध्यसागरीय देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर डाळिंबाची शेती केली जाते. म्यानमार, चीन, यूएसए काही प्रमाणात त्याची लागवड केली जाते.

डाळिंबाच्या लागवडीत भारताचा जगात पहिला क्रमांक लागतो. भारतात, महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, तामिळनाडू राजस्थान ही प्रमुख डाळिंब उत्पादक राज्ये आहेत. ९.४५ लाख मे.टन वार्षिक उत्पादन आणि १०.५ मेट्रिक टन/हेक्टर उत्पादकतेसह ९० हजार हेक्टर क्षेत्रासह महाराष्ट्र आघाडीवर आहे. भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या ७८ टक्के आणि एकूण उत्पादनाच्या ८४ टक्के वाटा महाराष्ट्र राज्याचा आहे.

हवामान : यशस्वी डाळिंब लागवड मूलत: कोरडे आणि अर्ध-रखरखीत हवामान असते, जेथे थंड हिवाळा आणि उच्च कोरड्या उन्हाळ्याच्या गुणवत्तेमुळे फळांचे उत्पादन शक्य होते. फळांच्या विकासासाठी इष्टतम तापमान ३५ -३८ डिग्री सेल्सियस आहे. समुद्रसपाटीपासून ५०० मीटर उंच असलेला प्रदेश डाळिंब लागवडीसाठी योग्य आहे.

माती : पिकाची गरज लक्षात घेऊन, कमी-सुपीक ते उच्च-सुपीक जमिनीपर्यंत वेगवेगळ्या प्रकारच्या मातीत डाळिंब पीक घेता येते. तथापि, खोल चिकणमातीमध्ये, ते उत्कृष्ट उत्पादन देते. ते जमिनीतील क्षारता आणि क्षारता एका मर्यादेपर्यंत सहन करू शकते. डाळिंब



शेतीसाठी ६.५ ते ७.५ दरम्यान पीएच श्रेणी असलेली माती आदर्श आहे.

प्रसार पद्धत : डाळिंबाची झाडे हार्डवुड कटिंग, एअर लेयरिंग आणि टिश्यू कल्चरद्वारे व्यावसायिकरित्या प्रसारित केली जाऊ शकतात.

हार्डवुड कटिंग प्रसार - ही पद्धत सोपी असली तरी तिचा यशाचा दर कमी आहे, त्यामुळे ही पद्धत शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय नाही. ९ ते १२ इंच (२५ ते ३० सें.मी.) लांबीच्या एक वर्षाच्या झाडापासून निवडलेल्या छाटणीसाठी, ४-५ काड्या जास्त रुजण्यासाठी आणि जगण्यासाठी उत्तम असतात. एअर-लेयरिंग प्रसार - नवीन रोपे वाढवण्याची शेतकऱ्यांची ही सर्वात सामान्य पद्धत आहे. एअर लेयरिंग पद्धतीसाठी, २ ते ३ वर्षे जुनी झाडे निवडाली जातात आणि चांगल्या मुळांसाठी (१,५०० ते २,५०० ) उपचार केला जातो. एका रोपापासून सुमारे १५० ते २०० रुजलेली कलमे मिळू शकतात. लेयरिंगसाठी पावसाळा सर्वात योग्य आहे. मुळांसाठी सुमारे ३० दिवस लागतात. ४५ दिवसांनंतर, स्तरित रोपे मातृ रोपापासून वेगळी कली जातात. तज्ञ डाळिंब उत्पादक मुळांच्या रंगाचे निरीक्षण करून विलग होण्याची वेळ ओळखतात जेव्हा ते तपकिरी होऊ लागतात तेव्हा स्तरित कलमे वेगळे करतात. नंतर ती पॉलीबॅगमध्ये उगवली जातात आणि शेड नेट किंवा ग्रीनहाऊसमध्ये ९० दिवसांपर्यंत ठेवतात.

टिश्यू कल्चर प्रसार : टिश्यू कल्चर हे वनस्पतींच्या गुणाकाराचे आगाऊ आणि जलद तंत्र आहे. या तंत्राचा वापर करून, तुम्ही कमी कालावधीत रोगमुक्त लागवड साहित्य मिळवू शकतो. ही टिश्यू कल्चर रोपे डाळिंब रोपवाटिकेत उपलब्ध आसतात ; ही रोपे विश्वासार्ह स्त्रोताकडून खरेदी करावीत.व्यावसायिक डाळिंबाच्या जाती : भारतात वाढणाऱ्या या व्यावसायिक जाती आहेत. भगवा, मृदुला, गणेश, ज्योती, जालोरे सीडलेस, कंधारी, फुले अरक्त, फुले भगवा सुपर, भगवा सिंदूर. देशांतर्गत आणि निर्यातीसाठी जास्त मागणी असल्यामुळे भागवा ही सर्वात जास्त लागवड केलेली जात आहे.

# काशीफळाची लागवड आणि व्यवस्थापन

पूर्वी परसबागेत किंवा शेतात कुठेतरी बांधावर, कोपऱ्यातील मोकळ्या जागेत काशीफळाच्या एक दोन वेलीची लागवड केली जाई. बहुतांश वेळी आपोआप बिया पडून उगवून येणारे हे दुर्लक्षित वेलवर्गीय वनस्पती आहे. पण गेल्या काही वर्षापासून उपयुक्त खाद्य म्हणून विशेष करून शेतामध्ये लागवड होऊ लागली आहे.जाती : काशीफळाच्या जवळपास ३० प्रजातींपैकी कुकुरबिटा पेपो, कुकुरबिटा मोशाटा, कुकुरबिटा मॅक्सिमा, कुकुरबिटा अग्रीरोस्पर्मा, कुकुरबिटा फिसिफोलिया या जातींची लागवड केली जाते. रंगाने आणि आकाराने वेगवेगळ्या प्रजाती काशीफळ पिकात उपलब्ध आहेत. याशिवाय सुधारित वाण दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेने पुसा विश्वास या जातीची शिफारस केली आहे. पुसा विकास, पुसा हायब्रीड १, अर्का सूर्यमुखी, अर्का चंदन, काशी हरित, काशी शिशिर एफ, आनंद पंपकीन १, को १, को २ या जातीही उपलब्ध आहेत. याशिवाय १ किलोपासून ३०-३५ किलो वजनापर्यंत वाढणारे काळा, मोठा गर्द हिरवा, मोठा गोल, चपटा हिरवा, पिवळा, लाल अशा विविध प्रकारांच्या काशीफळाचे संकरित वाण उपलब्ध आहेत.

हवामान :सुरुवातीच्या काळात चांगल्या वाढीसाठी किमान १८ अंश सेल्सिअस तापमान गरजेचे आहे. या पिकास उष्ण हवामान चांगले मानवते. वाढलेली थंडी या पिकाला उपयुक्त ठरते. सरासरी तापमान २५-३५ अंश सेल्सिअस लागवडीसाठी उपयुक्त आहे. कमाल तापमान ४० अंशापर्यंत, तर किमान १८ अंशांपर्यंत असावे. जास्त तापमानात नर फुलांची संख्या वाढून मादी फुलांची संख्या कमी होते. त्यामुळे उत्पादनामध्ये घट येते.लागवडीसाठी हंगाम : उन्हाळी हंगामात जानेवारी ते मार्च दरम्यान लागवड केली जाते. तर खरीप हंगामात जून-जुलैमध्ये २ ते ३ चांगला पाऊस झाल्यानंतर लागवड करावी.उन्हाळी हंगामाच्या तुलनेत खरीप हंगामात अधिक उत्पादन मिळते. रब्बी हंगामामध्ये तुलनेने उत्पादन कमी येते. अशी लागवड फायदेशीर ठरत नाही. हरितगृहामध्ये नियंत्रित वातावरणामध्ये रब्बीतही लागवड करणे शक्य आहे.

लागवडीचे अंतर : जमिनीचा पोत बघून दोन ओळींतील अंतर ६ किंवा ८ फूट आणि दोन वेलींतील अंतर ३ किंवा २ फूट ठेवावे. बियाणे २ ते २.५ सेंमी पेक्षा जास्त खोल टोकू नये. हलकी ते मध्यम स्वरूपाची पोयटा माती, सेंद्रिय पदार्थ युक्त व निचऱ्याची जमीन चांगल्या वाढीस उपयुक्त आहे. जमिनीचा सामू ६-७ पर्यंत असावा.

काढणी : हे पीक १०० ते १२० दिवसात तयार होते. दोन अवस्थांमध्ये काशीफळांची काढणी केली जाते. अपरिपक्व फळ हे भाजीसाठी वापरतात. पूर्ण परिपक्व झालेले फळ हे गोड पदार्थ व जास्त दिवस साठवून ठेवण्यासाठी वापरले जाते. साधारपणे ९० दिवसांपासून विविध वाणांची फळे काढणीस येतात. पिकाची काढणी जातिपरत्वे पिकाचा कालावधी पूर्ण झाल्यावर करावी. काढणी करताना फळाला १ इंच देठ ठेऊन तोडणी करावी.

उत्पादन : २० ते ४५ टन प्रति हेक्टर. वेगवेगळ्या प्रकारच्या फळानुसार दर मिळतो. एका वेलीवर दोन फळ अशाप्रकारे नियोजन केल्यास फळांचे वजन चांगले मिळते. जितके जास्त वजन तितकी अधिक मागणी बाजारपेठेमध्ये असते. स्थानिक बाजारांसोबत अन्य राज्यातील व्यापाऱ्याकडूनही मोठ्या प्रमाणात व वर्षभर मागणी असते.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५५२: गुरू अमर दास शिखांचे तिसरे गुरू बनले.
१६६८: इंग्रजांनी इस्ट इंडिया कंपनीच्या मध्यमातून मुंबई प्रांतावर आपले अधिकार प्राप्त केले होते.
१७८०: ब्रिटीश वर्तमानपत्र ब्रीट गैजेट आणि संडे मॉनीटर यांचे प्रकाशण सर्वप्रथम रविवारच्या दिवशी करण्यात आले.
१९०२: नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे केंद्रीय कायदेमंडळात अर्थसंकल्पावर इंग्रजीमध्ये अतिशय सुंदर असे पहिले भाषण झाले.
१९१०: लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी औंध संस्थानातील कुंडच्या माळावर कारखाना तसेच वसाहत उभारण्याच्या कामाला प्रारंभ केला. पुढे या परिसराला किर्लोस्करवाडी असे नाव रूढ झाले.
१९४२: इंदिरा नेहरू व फिरोझ गांधी यांचा विवाह.
१९४२: ऑस्विच येथील छळछावणीत पहिले महिला कैदी दाखल झाले.
१९७२: पहिली आंतरराष्ट्रीय संस्कृत परिषद संपन्न झाली.
१९७४: गढवालमधील हेनवलघाटी येथे गौरा देवी यांच्या नेतृत्त्वाखाली चिपको आंदोलनाची सुरूवात.
१९७९: अन्वर सादात, मेनाकेम बेगिन आणि जिमी कार्टर यांनी वॉशिंग्टन (डी. सी.) येथे इस्त्रायल-इजिप्त शांतता करारावर सह्या केल्या.
२०००: ब्लादिमिर पुतिन यांची रशियाच्या अध्यक्षपदी निवड झाली.
२०१३: त्रिपूरा उच्च न्यायालयाची स्थापना.
१९७१: बांगलादेश चा स्वातंत्र्य दिन.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७४: अमेरिकन कवी रॉबर्ट फ्रॉस्ट यांचा जन्म.
१८७५: दक्षिण कोरियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष सिंगमन ऱ्हीं यांचा जन्म.
१८७९: स्विस-अमेरिकन सिव्हिल इंजिनियर ओथमार हमेन अम्मान यांचा जन्मदिन. त्यांनी डिझाईन केलेल्या ब्रिज डिझाईन्समध्ये जॉर्ज वॉशिंग्टन ब्रिज, वेर्राझानो-नारोज ब्रिज आणि बायोन ब्रिज यांचा समावेश आहे.
१८९८: जर्मन स्पोर्ट्सवेअर कंपनी पुमा व ॲडिडासचे संस्थापक रुडॉल्फ ''रुडी'' डसलर यांचा जन्मदिन.
१९०७: हिन्दी कवयित्री, स्वातंत्र्यसैनिक, शिक्षणतज्ञ महादेवी वर्मा यांचा जन्म. (मृत्यू: ११ सप्टेंबर १९८७)
१९०९: साहित्यिक, संशोधक, दैनिक गोमंतक चे पहिले संपादक बाळकृष्ण दत्तात्रेय तथा बा. द. सातोस्कर यांचा जन्म. (मृत्यू: २७ नोव्हेंबर २०००)
१९१९: भारतीय राजकारणी, महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते आणि दिग्गज काँग्रेसचे नेते तासेच विधानसभेचे माजी सभासद व माजी कॅबिनेट मंत्री भिकाजीराव जिजाबा खताल- पाटील यांचा जन्मदिन.
१९२९: शीख धार्मिक नेत्यांच्या संत मतवादी वंशाचे आध्यात्मिक शिक्षक ठाकर सिंह यांचा जन्मदिन.
१९३३: हिंदी साहित्य व संस्कृतीचे लेखक आणि अभ्यासक कुबेर नाथ रे यांचा जन्मदिन.
१९६९: विक्रम राठोड, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९७३: गुगल चे सह-संस्थापक लॅरी पेज यांचा जन्म.
१९७३: लंडन स्टॉक एक्सचेंज ने २०० वर्ष जुने ऐतिहासिक नियम मोडीत काढत महिलांना पहिल्यांदाच नोकरीवर रुजू करून घेतले.
१९८५: झिम्बाब्वेचा क्रिकेट खेळाडू प्रॉस्पर उत्सेया यांचा जन्म.
१९८७: भारतीय फुटबॉल खेळाडू रॉविल्सन रॉड्रिग्ज यांचा जन्मदिन.
१९९८: पुमा से कंपनी चे निर्माते रुडॉल्फ दास्स्लेर यांचा जन्म. (मृत्यू: १९७४)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२७: कर्णबधिर संगीतकार लुडविग व्हान बीथोव्हेन यांचे निधन. (जन्म: १६ डिसेंबर १७७०)
१८२५: वेस्टर्न युनियन चे सहसंस्थापक अंसन स्तागेर यांचे निधन. (जन्म: २० एप्रिल १८२५)
१९३८: लक्ष्मीनाथ बेझबरुआ, ज्येष्ठ असमिया साहित्यिक.
१९९६: के. के. हेब्बर, भारतीय चित्रकार.१९९७: नवकमल फिरोदिया, ज्येष्ठ गांधीवादी, स्वातंत्र्यसैनिक आणि उद्योगपती.
१९९८: डॉ. शांतिनाथ देसाई -कन्नड साहित्यिक.
१९९९: आनंद शंकर - संगीतकार.
२००१: जनार्दन हरी पटवर्धन - स्वातंत्र्यसैनिक आणि सनदी अधिकारी.
२००३: डॅनियेल पॅट्रिक मॉयनिहॅन - अमेरिकन सेनेटर, भारतातील अमेरिकेचे राजदूत आणि अमेरिकेच्या सिनेटमध्ये भारताची बाजू मांडणारा नेता.
२००३: हरेन पंड्या - गुजरातचे माजी मंत्री (हत्या).
२००३: देविदास सडेकर - मराठी पत्रकार.
२००६: भारतीय राजकारणी व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे पश्चिम बंगाल राज्य समितीचे सचिव अनिल विश्वास यांचे निधन.
२००८: महाराष्ट्रीयन मराठी लेखक व दलित साहित्यिक बाबुराव बागूल यांचे निधन.
२०१२: प्रसिद्ध पराङ्मुख गीतकार व कवी माणिकराव गोडघाटे ऊर्फ ग्रेस यांचे निधन. (जन्म: १० मे १९४०).

# देशी आणि जर्सी गाय यामधील फरक

देशी गायीला भारतीय गाय म्हणतात. या बॉस इंडिकस श्रेणीतील गायी आहेत. ते लांब शिंगे आणि मोठ्या कुबड्यांद्वारे ओळखले जातात. ही गाय निसर्गाने विकसित केली आहे. उत्तर भारतात देशी गायींच्या अनेक जाती आढळतात. देशी गायी उष्ण तापमानात राहतात. या गाईची दूध क्षमता खूप चांगली आहे.

शेतकरी आणि पशुपालक त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी अनेक प्रकारची दुभती जनावरे पाळतात. आजच्या काळात पशुपालन हा उत्तम व्यवसाय आहे. परंतु गायींची योग्य माहिती नसल्याने पशुपालकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. अशा परिस्थितीत आज आम्ही शेतकरी आणि पशुपालकांसाठी देशी आणि जर्सी गाईंशी संबंधित काही महत्त्वाची माहिती घेऊन आलो आहोत. जेणेकरून गरजेनुसार योग्य गाय पाळता येईल. आपल्या देशात गायींच्या अनेक जाती आढळतात. परंतु देशी आणि जर्सी गायींचे पालन बहुतेक पशुपालक करतात. देशी आणि जर्सी गायींमध्ये काय फरक आहे ते पाहूया.

देशी गाय : देशी गायीला भारतीय गाय म्हणतात. या बॉस इंडिकस श्रेणीतील गायी आहेत. ते लांब शिंगे आणि मोठ्या कुबड्यांद्वारे ओळखले जातात. ही गाय निसर्गाने विकसित केली आहे. उत्तर भारतात देशी गायींच्या अनेक जाती आढळतात. देशी गायी उष्ण तापमानात राहतात. या गाईची दूध क्षमता खूप चांगली आहे.

जर्सी गाय : जर्सी गाय बॉश टेरेसच्या श्रेणीत येते. जर्सी गाई देशी गायींपेक्षा जास्त दूध देतात. या गायींना लांब शिंगे आणि मोठे कुबडे नसतात. भारतात गायीची सर्वाधिक निर्यात होते. जर्सी गायी थंड हवामानात राहतात.

देशी आणि जर्सी गाय मधील फरक : १) भारतात देशी गायीला मातेचा दर्जा मिळाला आहे. तर ब्रिटनमध्ये जर्सी गाईला महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. २) देशी गाय बॉश इंडिकस कॅटेगरीत आणि जर्सी गाय बॉश टॉरस कॅटेगरीमध्ये येते. ३) देशी गायीचा विकास निसर्गावर अवलंबून असतो. देशी गायीचा विकास हा हवामानाची परिस्थिती, चाऱ्याची उपलब्धता, कामाच्या पद्धती इत्यादींवर अवलंबून असतो, तर जर्सी गायीचा विकास थंड तापमानावर अवलंबून असतो. ४) देशी गायीची शिंगे लांब असतात आणि मोठ्या कुबड्या असतात, तर जर्सी गायीमध्ये असे होत नाही. ५) देशी गायी जर्सी गायींपेक्षा आकाराने लहान असतात. ६) देशी गायी सुमारे ३ ते ४ लिटर दूध देतात. तर जर्सी गायी सुमारे १२ ते १४ लिटर दूध देतात. ७) साधारणपणे देशी गायींना मूल होण्यासाठी ३० ते ३६ महिने लागतात. मात्र जर्सी गायींना १८ ते २४ महिने लागतात. ८) एक देशी गाय आपल्या आयुष्यात १० ते १२ वासरांना जन्म देऊ शकते. त्याच वेळी जर्सी गाय अनेक वासरांना जन्म देऊ शकत नाही.








राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
शुक्रवार दि. २७ मार्च २०२६




# संभाजीनगरमध्ये पेट्रोल पंपावर तोबा गर्दी

## वाहनांच्या प्रचंड रांगा, टू व्हिलरला फक्त २०० चे पेट्रोल मिळणार

छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात लॉकडाऊन लागू होणार असल्याची अफवा वाऱ्यासारखी पसरताच पेट्रोल पंपांवर वाहनधारकांची अक्षरशः झुंबड उडाली आहे. 'उद्या पेट्रोल मिळणार नाही' या भीतीने नागरिकांनी मोठ्या प्रमाणात पेट्रोल-डिझेल भरण्यासाठी रांगा लावल्यात. शहरातील सर्वच पेट्रोल पंपांवर दोन दिवसांपासून लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहे. या अचानक वाढलेल्या गर्दीमुळे अनेक ठिकाणी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पंपावर काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याने सांगितले, ''इंधनाचा कोणताही तुटवडा नाही, पण लोक अफवांवर विश्वास ठेवून एकाच वेळी गर्दी करत आहेत. त्यामुळे व्यवस्थापन करणे कठीण जात आहे.''

दुसरीकडे तेल कंपन्यांनी आता ॲडव्हान्स रक्कम घेणे सुरू केले आहे. त्यामुळेही पेट्रोल उशिरा येत असल्याचे समजते. या साऱ्या गोंधळामुळे नागरिकांमध्ये मात्र संतापाचे वातावरण दिसून आले. एका वाहनधारकाने प्रतिक्रिया देताना म्हटले, ''सरकारने आधी स्पष्ट माहिती द्यायला हवी. अफवा पसरतात कारण अधिकृत माहिती वेळेवर मिळत नाही.'' तर दुसऱ्या एका नागरिकाने सांगितले की, ''आम्हाला खात्री नाही उद्या काय होईल, म्हणून आजच पेट्रोल भरून घेतोय.'' एकंदर पॅनिक स्थिती निर्माण झालीय. या ग्राउंड रिपोर्टमधून जाणून घेऊयात नेमकी काय परिस्थिती आहे . तेल कंपन्यांनी व्यवहाराची पद्धत बदलली आहे. यापूर्वी पेट्रोल पंपचालक आधी तेल घ्यायचे. त्यानंतर पैशाचा भरणा होत असे. मात्र, आता अमेरिका-इराण युद्ध सुरू झाले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर इंधन प्रश्न निर्माण झाला. हे पाहता तेल कंपन्यांनी ॲडव्हान्स रक्कम घेणे सुरू केले. मात्र, पेट्रोल पंपचालक ॲडव्हान्स रक्कम देत नाहीत. त्यामुळे त्यांना पेट्रोल मिळत नसल्याचे समोर आले आहे. बहुतांश पंपचालक उशिरा पेमेंट देत आहेत. त्यामुळे सर्वांनाच उशिरा इंधन



मिळत आहे. याचा फटका वाहनधारकांना बसत असून, पेट्रोल पंपावर रांगा लागल्याचे चित्र आहे.

एका तरुणाने सांगितले की, 'गेली चार तास आम्ही रांगेत उभे आहोत. पण आम्हाला अजूनही पेट्रोल मिळालेले नाही. या उडालेल्या अफवेमुळे ज्यांच्या गाड्यांमध्ये पेट्रोल आहे ते लोकही इथे येऊन गर्दी करत आहेत. एका वृद्ध नागरिकाने सांगितले की, 'गेली दोन तास झाले मी या रांगेत उभा आहे. इथे लोक गाड्यात पेट्रोल असूनसुद्धा पेट्रोल भरायला आले आहेत. मी बघतोय अनेकजण त्यांच्या गाडीतून पाइपने पेट्रोल काढून ते कॅनमध्ये भरत आहेत. त्यांच्यामुळे आमच्यासारख्या वयस्करांना दिवसभर उन्हातान्हाच थांबावं लागत आहे.

पेट्रोल पंप कर्मचाऱ्यांनी या परिस्थितीबाबत चिंता व्यक्त केली आहे. एका कर्मचाऱ्याने सांगितले की, ''इंधनाचा पुरवठा सुरू आहे, पण लोक घाबरून एकाच वेळी मोठ्या प्रमाणात येत आहेत. त्यामुळे साठा पटकन संपतो आणि पंप बंद करावे लागतात.'' नागरिकांमध्ये अस्वस्थता आणि संताप स्पष्टपणे दिसून येत आहे. एका वाहनधारकाने प्रतिक्रिया देताना म्हटले, सरकारने वेळेवर स्पष्ट माहिती दिली असती तर अशी परिस्थिती निर्माण झाली नसती.'' तर दुसऱ्या नागरिकाने सांगितले, ''उद्याची खात्री नाही, म्हणून आजच इंधन भरून घेतोय.'' इंधन गोंधळाचा फटका पाणीपुरवठ्यालाही बसला आहे. बीड बायपास परिसरात टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो. मात्र, डिझेल न मिळाल्याने अनेक टँकरच्या फेऱ्या विस्कळीत झाल्या. संभाजीनगर जिल्ह्यात दररोज १९,१३० सिलिंडरचा पुरवठा होत आहे. मात्र, बुकिंगचा आकडा तब्बल ६० हजारांच्या वर गेला आहे. लोकांच्या पॅनिक बुकिंगमुळे यंत्रणेवर मोठा ताण येत असून गरजेनुसार गॅस उपलब्ध असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा

छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाने पेट्रोल-डिझेल खरेदीवर तात्पुरत्या मर्यादा लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. अफवांना आळा घालण्यासाठी हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून, दुचाकी वाहनांना केवळ २०० रुपयांचे पेट्रोल, तर तीन व चार चाकी वाहनांना जास्तीत जास्त २००० रुपयांचे पेट्रोल किंवा डिझेल खरेदी करता येणार आहे.जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी यांनी याबाबत माहिती दिली. त्यांच्या मते, जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. मात्र, काही अफवांमुळे नागरिक मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त इंधन भरून घेत आहेत, ज्यामुळे कृत्रिम तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे.या पार्श्वभूमीवर, नागरिकांनी घाबरून न जाता आवश्यक तेवढेच इंधन भरावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्यांना इंधनाचा सुरळीत पुरवठा सुनिश्चित होईल, असा विश्वासही प्रशासनाने व्यक्त केला आहे. या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# जिल्हाधिकारी यांच्या हस्ते वारसांना नियुक्तीपत्रे प्रदान करुन सेवेचा दिला आधार

जालना

अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (ॲट्रॉसिटी) दाखल झालेल्या गंभीर प्रकरणांतील दिवंगत व्यक्तींच्या वारसांना शासनाने मोठा दिलासा दिला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार जालना जिल्ह्यातील अशा ८ पात्र वारसांची शैक्षणिक अर्हतेनुसार वर्ग-४ पदावर निवड करण्यात आली आहे. बुधवार दि.२५ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एका विशेष कार्यक्रमात या लाभार्थ्यांना नियुक्ती पत्रांचे वाटप करण्यात आले, ज्यामुळे संघर्षानंतर या कुटुंबांना हक्काचा आधार मिळाला आहे.

जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या शिफारशीनुसार, सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, शासकीय वसतिगृहे



आणि निवासी शाळांमधील रिक्त पदावर या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये शारदा मांदळे (पहारेकरी), संगिता रंजवे (शिपाई), रमा लाटे (पहारेकरी), साईनाथ कसारे (शिपाई), साईनाथ जाधव (सफाईगार), विशाल खरात (शिपाई), दिपक जाधव (शिपाई) आणि पंकज पाटोळे (शिपाई) या आठ जणांचा समावेश आहे. आपल्या कुटुंबातील कर्ता व्यक्ती गमाविल्याचे दुःख बाजूला सारून शासकीय सेवेच्या माध्यमातून सन्मानाने जगण्याची नवी उमेद या वारसांच्या चेहऱ्यावर यावेळी दिसून आली. तसेच सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून घेतलेला हा निर्णय पीडित कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी महत्त्वाचा टप्पा असल्याचे दिसून येत आहे.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या हस्ते हे नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी नवनियुक्त उमेदवारांचे अभिनंदन करत त्यांना भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व प्रशासकीय कामात सचोटीने योगदान देण्याचे आवाहन केले. याप्रसंगी विशेष अधिकारी स्नेहल मोदाळे, समाजकल्याण निरीक्षक अनिल सुनगत यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके यांचे भगवानगड परिसरात भव्य स्वागत



पाथर्डी प्रतिनिधी

ओबीसी नेते व राज्य मागासवर्गीय आयोगाचे माजी सदस्य प्रा.लक्ष्मण हाके यांचे भगवानगड परिसरात जय जवान जय किसान कृषी सेवा केंद्र संचालक संजय किर्तने यांनी स्वागत केले यावेळी सोमनाथ दराडे विनायक किर्तने प्रल्हाद किर्तने विक्रम खेडकर तसेच ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते प्रा.लक्ष्मण हाके हे पाथर्डी दौऱ्यावर आले असताना त्यांनी शिंगोरी येथील सद्गुरु नारायण महाराज यांनी प्रारंभ केलेल्या नारळी सप्ताहास भेट दिली व तारकेश्वर गडाचे महंत ह.भ.प.आदिनाथ महाराज शास्त्री यांची भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली त्यानंतर प्रा.लक्ष्मण हाके हे पाथर्डी तालुक्यातील दैत्यनांदूर किर्तनवाडी खरवंडी कासार या गावातील ओबीसी बांधवांना कौटुंबिक भेटी दिल्या आणि मिडसांगवी येथे चालू असलेल्या निगमानंद महाराजांच्या नारळी सप्ताहास भेट दिली आणि बीड जिल्ह्याकडे प्रस्थान केले.

# सुनील साबळे आणि दिनेश पुसदकर यांच्या विरोधात महसुल मंत्र्यांकडे तक्रार

पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील भालगाव येथील पीडित शेतकरी पांडुरंग मायनजी घुले व त्यांचे दोन मुलं हरी पांडुरंग घुले वसंत पांडुरंग घुले या बंधूंच्या शेतजमीन गट नंबर ४२४ ४२५ व ३९१ शेतजमिनीत (वहिवाट आणि बांध) सामनेवाले एकनाथ घुले यांच्यात शेतजमीनमोजणी वरून वाद आहे यासंदर्भात पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपअधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर सुनील साळवे यांच्या भ्रष्ट कारभारामुळे वसंत घुले आणि हरी घुले यांच्या शेतजमिनीमध्ये एकनाथ घुले यांनी वहिवाटीत अतिक्रमण केले असल्याची तक्रार थेट महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे बनावट दस्तावेज तयार करून मोजणीत फेरफार केल्याप्रकरणी पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन कर्मचारी निखिल मोरे व विद्यमान कर्मचारी दिनेश पुसदकर व सुनील साबळे यांचे निलंबन करण्याची मागणी केली आहे.

चौकट- पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपाधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर व सुनील साळवे यांनी लाखो रुपयांची आर्थिक देवाणघेवाण करून संगनमताने भालगाव येथील शेतकरी पांडुरंग मायनजी घुले त्यांचे मुलं वसंत घुले व हरी घुले यांच्या शेतजमीन गटनंबर ३९१ ४२४ व ४२५ जमीन मोजणीमध्ये २०/१२/२०२४ २०/०६/२०२५ तारखेला केलेल्या हद्दीखुणा २०/३/२०२६ रोजी केलेल्या हद्दीखुणा गट नंबर ३९१ मध्ये कायम मोजणी सीट व पोटहिस्सा यामध्ये सुद्धा प्रचंड तफावत जाणवत आहे.

### भालगाव येथील शेतजमिनीत अतिक्रमण आणि मोजणी फेरफार प्रकरण

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे अप्पर सचिव विकास खारगे भूमिअभिलेख उपसंचालक महेश इंगळे अहिल्या नगर जिल्हा भूमी अधीक्षक संजय कुंभार यांच्याकडे पाथर्डी भूमिअभिलेख कार्यालयातील भ्रष्ट कर्मचारी निखिल मोरे दिनेश पुसदकर व सुनील साबळे यांची खातेनिहाय चौकशी लावून त्यांना निलंबित करण्याची मागणी आहे.

**-पांडुरंग मायनजी घुले** (पीडित शेतकरी भालगाव)


# खरवंडी गोपीनाथ मुंडे चौकात श्रीरामनवमी साजरी

पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार ालोकनेते गोपीनाथ मुंडे चौकात श्रीरामनवमी सकल हिंदू समाजाच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली गुरुवारी सकाळी श्रीरामचंद्रप्रभूंच्या प्रतिमेचे तुळजाभवानी संस्थानाचे महंत महाराज खताळ यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

यावेळी विश्वहिंदू परिषदेचे प्रखंड सहमंत्री गणेश जवरे, ज्येष्ठ नेते संजय किर्तने, भाजप सहकार आघाडीचे वामन किर्तने, राष्ट्रवादी श.प.गटाचे अध्यक्ष महारुद्र किर्तने, भाजपा वैद्यकीय आघाडीचे डॉ.ज्ञानेश्वर दराडे, पिराजी किर्तने, अशोक बोडगीवार, तुकाराम खेडकर, विनोद घुले, अमोल खेडकर, अतुल किर्तने, उद्धव किर्तने, दीपक किर्तने, पिराजी फुंदे, राहुल खेडकर, सुनील जवरे, बाळासाहेब घुले, किरण केळगंद्रे, भाऊसाहेब , दादा जाधव तसेच मोठ्या संख्येने हिंदू बांधव उपस्थित होते.

भगवानगड परिसरातील खरवंडी कासार येथे श्रीरामनवमीनिमित्त दिवसभर जवळपास ५० ते ६० रुग्णांनी रक्तदान करत नेत्रतपासणी करण्यात आली. तसेच राष्ट्रीय स्वयंसंघ प्रणित जनकल्याण रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते स्व.शेषराव जवरे यांच्या सामाजिक कार्याला उजाळा देण्यात आला. सायंकाळी भगवानगड परिसरात विश्वहिंदू परिषदेचे प्रखंडसहमंत्री गणेश जवरे यांच्या नेतृत्वाखाली भव्य शोभायात्रा काढण्यात आली.



श्रीरामचंद्रप्रभू त्यागाचं, शौर्याचं, चारित्र्य व आदर्श राजकारणाचं प्रतीक आहे. रामजन्मोत्सव म्हणजे देशभक्ती श्रद्धा आणि संस्कार यांचे मनोमिलन आहे, यामुळे हिंदुस्तान हा देश अखंड हिंदुराष्ट्र व्हावा हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्वप्न आहे. म्हणून युवकांनी त्याग, शौर्य संघटन या शक्तीवर भर देऊन देशासाठी बलिदान देण्यासाठी सज्ज रहावे आणि देशातील विकृती, विघातक शक्ती, लव जिहाद, लँड जिहाद, परकीय आक्रमण आणि आपल्या आया बहिणी आणि स्त्रीच्या इज्जतीवर टाच आणणाऱ्या अपप्रवृत्तींना ठेचण्यासाठी हिंदूंचे संघटन सशक्त असणे आवश्यक आहे. - महाराज खताळ

# अवकाळीची शक्यता,पुढील ३ दिवस ढगाळ वातावरण

धाराशिव। प्रतिनिधी

जिल्ह्यात पुन्हा एकदा अवकाळी पावसाचे ढग दाटू लागल्याने बळीराजाची चिंता वाढली आहे. तुळजापूर तालुक्यातील तीर्थ बुद्रुक, बारूळ परिसरात मंगळवारी दुपारी हलक्या सरी कोसळल्या. मंगळवारी दिवसभर उन्हाचा पारा वाढत असतानाच दुपारनंतर आकाशात ढगांनी दाटी केली. पावसाचे वातावरणही तयार झाले. चार-पाच दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसानंतर मंगळवारी कमाल तापमान ३७ अंश सेल्सिअस नोंदवले गेले.

बुधवारी पुन्हा तुळजापूर, लोहारा, उमरगा, धाराशिव तालुक्याचा दक्षिण भागात पावसाची शक्तता असल्याचे हवामान अभ्यासक सूरज जाधव यांनी सांगितले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सतर्क राहून रब्बी हंगातील काढणीला आलेल्या पिकांचे नुकसान टाळण्यासाठी सतर्क राहावे, असे आवाहन केले आहे. कृषी विज्ञान केंद्राचे हवामान अभ्यासक डॉ. नकुल हारवाडीकर यांनी बुधवारी एक दिवस पावसाची शक्यता वर्तवली आहे.धाराशिव जिल्ह्यासह सोलापूर, लातूर, नांदेड जिल्ह्यात वादळी पावसाची शक्यता आहे. अंदाजानुसार मंगळवारी दुपारी उमरगा तालुक्यातील तुगाव, तुळजापूर तालुक्यातील तीर्थ बुद्रुक, बारूळसह उमरगा तालुक्यातील बऱ्याच भागात हलक्या ते मध्यम पावसाने हजेरी लावली. मराठवाड्यात मंगळवारी विजांसह वादळी पाऊस होण्याची शक्यता वर्तवली होती. त्यानुसार अनेक ठिकाणी पाऊस झाला आहे. पश्चिमी आवर्तनामुळे जिल्ह्यात आजही पावसाची दाट शक्यता आहे. त्यामुळे बुधवारी तुळजापूर, लोहारा, उमरगा, धाराशिव तालुक्यातील दक्षिण भागात ढगाळ वातावरणासह काही ठिकाणी मेघगर्जनेसह तर काही ठिकाणी जोरदार पाऊस पडेल, असा अंदाज हवामान अभ्यासक जाधव यांनी अंदाज व्यक्त केला आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/२७०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०४/०३/२०२६

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) उषा राजेंद्र घोलप २.रंजित राजेंद्र घोलप रा. अंबड सिटी सर्व्हे नं. ८३३ नं.प.घर क्रमांक ७-५३ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (७-५३) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- रस्ता
पश्चिम : सर्जेराव रांजणे यांची जागा
दक्षिण- हिवाळे यांचे घर
उत्तरः रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

# राज्यातील टपाल अन् पासपोर्ट कार्यालये बॉम्बने उडवण्याची धमकी

## सायनाईड मिश्रित आरडीएक्स असल्याच्या ईमेलने खळबळ, यंत्रणा सतर्क

हिंगोली। प्रतिनिधी

राज्यातील टपाल कार्यालय पासपोर्ट कार्यालय सायनॉईड विषारी वायू मिश्रीत आरडीएक्स बॉम्बचा स्फोट होणार असल्याचा ईमेल बुधवारी (ता. २५) टपाल कार्यालयास प्राप्त झाला असून त्यामुळे बहुतांश ठिकाणी टपाल कार्यालयातील कामकाज बंद करून तपासणीचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले आहे. सदर ईमेल कोणत्या भागातून आला याचीही पोलिसांनी चौकशी सुरु केली आहे. या संदर्भात सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील टपाल कार्यालयांना आज ईमेल प्राप्त झाला आहे. 'तुमच्या राज्यातील सर्व पासपोर्ट व टपाल कार्यालयात दुपारी बारा वाजून १० मिनीटांनी सायनाईड विषारी वायू मिश्रीत १६ आरडीएक्स बॉम्बचा स्फोट होणार आहे. सर्वांना तातडीने बाहेर काढा', असे या ईमेलमध्ये नमूद करण्यात आले आहे.

या ईमेलमुळे राज्यातील बहुतांश टपाल कार्यालयातून एकच खळबळ उडाली आहे. या प्रकाराची माहिती पोलिसांना देण्यात आली असून काही ठिकाणी पोलिसांकडून तपासणीचे काम हाती घेण्यात आले आहे. यामध्ये प्रामुख्याने पासपोर्ट कार्यालयाची बॉम्ब शोध व नाशक पथकाकडून तपासणी केली जात असून तसेच पार्सलचे बॉक्स तपासले जात आहेत. राज्यभरात तपासणी सुरु असल्याचे हिंगोलीचे पोस्टमास्तर एस. एस. निर्मल यांनी सांगितले. हिंगोली कार्यालयाला माहिती मिळताच पोलिस अधिक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधिक्षक कमलेश मीना, गुन्हे शाखेचे निरीक्षक मोहन भोसले, पोलिस निरीक्षक संदीप मोदे, जमादार अशोक धामणे, शेख मुजीब, संतोष करे, गणेश लेकुळे, गणेश वाबळे, संजय मार्के यांच्यासह पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली आहे. पोलिसांनी पोस्ट ऑफीस परिसरात बॉम्ब शोधक व नाशक पथकाकडून तपासणीचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर ई मेल कोणत्या ठिकाणावरून आला याची चौकशी केली जात आहे. हिंगोलीच्या नागरीकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये असे आवाहन पोलिस अधिक्षक निलाभ रोहन यांनी केले आहे

# ना.पंकजाताई मुंडेंच्या हस्ते श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रेस प्रारंभ

## जय श्रीरामचा मोठा जयघोष, विविध ठिकाणी सांत्वनपर भेटी; मुस्लिम बांधवांना दिल्या ईदच्या शुभेच्छा

बीड । प्रतिनिधी

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज शहरात आरतीने श्रीराम जन्मोत्सव मिरवणूकीस प्रारंभ झाला. वाजत-गाजत, मोठया हर्षोल्हासात ही मिरवणूक शहराच्या मुख्य मार्गावरून काढण्यात आली. ना. पंकजाताईंनी आज विविध ठिकाणी सांत्वनपर भेटी दिल्या तसेच मुस्लिम बांधवाना ईदच्याही शुभेच्छा दिल्या.**

ना. पंकजाताई मुंडे यांचे दुपारी शहरात आगमन झाले.

भाजप अल्पसंख्यांक आघाडीचे माजी प्रदेशाध्यक्ष दिवंगत एजाज भाई देशमुख यांच्या शोकसभेस उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.एजाजभाई हे मुंडे साहेबांचे अत्यंत लाडके कार्यकर्ते होते. अल्पसंख्यांक आघाडीच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाच्या वाढीसाठी त्यांनी अविस्मरणीय योगदान दिले. अत्यंत शांत आणि सतत चेहऱ्यावर स्मितहास्य ठेवणारे तळमळीचे कार्यकर्ते



अशी त्यांची ओळख निर्माण झाली होती. त्यांच्या जाण्याने आपण मुंडे साहेबांच्या शिकवणीवर चालणारा सक्रिय कार्यकर्ता गमावला आहे अशा शब्दात एजाजभाई देशमुख यांना श्रध्दांजली वाहिली. याप्रसंगी भाजप अल्पसंख्यांक आघाडीचे राष्ट्रीय नेते जमाल सिद्दीकी,



आ. संजय केणेकर, डॉ. योगेश क्षीरसागर, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, इद्रीस मुलतानी,सलीम जहांगीर, उमेर सलीम, कल्याण आखाडे, काझी मकदूम यांच्यासह विविध पक्षातील मान्यवर उपस्थित होते.

### श्रीराम जन्मोत्सव मिरवणूकीचा आरतीने प्रारंभ

श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने शहरातून काढण्यात आलेल्या मिरवणुकीला कंकालेश्वर मंदिर येथे ना. पंकजाताईंच्या हस्ते आरती करून सुरवात करण्यात आली. आरती नंतर मिरवणूक वाजत-गाजत, मोठया जल्लोषात शहरातून निघाली.

### मुस्लिम बांधवांना दिल्या शुभेच्छा

ना. पंकजाताईंनी दैनिक रिपोर्टर चे संपादक शेख तय्यब, भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा यांच्या घरी सांत्वनपर भेट दिली. भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष इर्शाद भाई यांनी आयोजित केलेल्या ईद मिलापला भेट देऊन मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. या दौऱ्यात जिल्ह्यातील भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध वाळुची वाहतूक करणारी हायवा गाडी तलवाडा पोलीसांनी केली जप्त

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील सपोनि निलंगेकर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, माजलगाव ते गढी रोडवर वाळु चोरटी विक्री करण्यासाठी एक इसम त्याच्या ताब्यात हायवामध्ये विनापरवाना बेकायदेशीररित्या अवैध वाळु भरुन घेवुन जाणार आहे.

अशी खात्रीलायक माहीती मिळाल्याने दोन पंचांना बोलावुन त्यांना बातमीतील माहीती कळवुन



नंदपुर फाटा येथे सापळा लावुन थांबलेले असतांना आरोपी नामे हसनलाल लालामिया कुरेशी, वय-२९ वर्ष, रा. मालेपारगाव ता. माजलगाव जि. बीड हा विनापरवाना बेकायदेशीररित्या त्याचे हायवा गाडीच्या सहाय्याने शासनाचा कर चुकवुन वाळुची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाळुची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने सदर वाळुने भरलेली हायवा गाडी आणि वाळु असा एकुण ३५,२५,०००/- रु मुद्देमाल पंचनामा करुन जप्त करण्यात आहे. त्यानंतर पोअं/ ९७४ विठ्ठल राठोड यांनी सरकारतर्फे ◀◀ पान ३ वर

# जबरी चोरी करणाऱ्या अट्टल गुन्हेगारास अटक, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षकांनी जिल्ह्यातील चोरी, घरफोडी, जबरी चोरी व दरोडा इत्यादी मालमत्तेचे विरूध्द गुन्हे उघड करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिलेले आहेत. दि.२३ मार्च रोजी फिर्यादी बाळासाहेब सोपानराव घुले रा.समतानगर केज हे सायंकाळी ६.१५ वा सुमारास केज शहरातुन पायी त्यांचे दुकानाकडे जात असतांना प्रशांत बिअरबारच्या समोर मोबाईल



फोनवर बोलत जात असतांना दोन अज्ञात इसमांनी त्यांचे पाठीमागुन गाडीवर येवुन फिर्यादी यांचा मोबाईल फोन व रोख रक्कम २०००/- रुपये जबरीने चोरी करुन घेवुन गेले होते. या फिर्यादीवरुन पो.स्टे. केज गु.र.नं. १४९/२०२६ कलम ३०९ (४), ३(५) भान्यासं प्रमाणे गुन्हा नोंद केला होता.

सदर गुन्ह्यातील आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना अटक करण्या बाबत पोलीस ◀◀ पान ३ वर

# चौसाळा येथे उरूस निमित्ताने उद्या कुस्त्यांचा जंगी फड

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा तालुका बीड येथील हिंदू मुस्लिम बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत चंदन शहावली देवस्थानच्या उरुषानिमित्ताने ४ दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे या उरूस निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला दिनांक २७ ०३ २६ शुक्रवार रोजी सांस्कृतिक कार्यक्रम होऊन रात्री शोभेच्या दारूची उधळण



आयोजित केली आहे तसेच दिनांक २८ ०३ २६ शनिवारी दुपारी ०२ ते ५ दरम्यान कुस्त्यांचा जंगी फडा आयोजन करण्यात आले असून शेवटची कुस्ती अकरा ११११११ रुपयाची होऊन विजय मल्लास चांदीची ढाल गदा देण्यात येणार आहे त्याचप्रमाणे दिनांक २९ रविवार संध्याकाळी शुभांजली थोरात यांचा लावण्याचा कार्यक्रम जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा या ठिकाणी होणार आहे.तरी ◀◀ पान ३ वर




# पुजा धोंडे यांना राज्यस्तरीय 'समाजभूषण पुरस्कार'

आष्टी । प्रतिनिधी

अहिल्यानगर येथे विविध सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'समाजभूषण पुरस्कार' वितरण सोहळयात आष्टी येथील सामाजिक कार्यकर्त्या पुजा बिभीषण देवळकर (धोंडे) यांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील निस्वार्थ सेवेबद्दल सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारामुळे आष्टी तालुक्याचा गौरव वाढला असून सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

रयत प्रतिष्ठान, जय युवा अकॅडमी, क्रांती ज्योती बहुद्देशीय संस्था, ◀◀ पान ३ वर

# युसुफवडगांव येथे श्रीराम नवमी जन्मोत्सव सोहळ्यास भाविक भक्तांची अलोट गर्दी

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथे श्रीराम नवमी जन्मोत्सवस सोहळ्यास मोठ्या उत्साहात सुरुवात'' दशरथनंदन श्रीरामचंद्र महाराज की जय '' असा जयघोष करीत भाविकांनी भरलेल्या १२ गाड्या ओढण्याची परंपरा कायम ठेवली.

युसूफवडगांव येथे अतिशय प्राचीन राम मंदीरात प्रभू रामचंद्रासोबत सीता माता,लक्ष्मण,भरत,शत्रुघ्न,आणि मारुती या देवतांच्या पंचधातुच्या



मुर्ती आहेत.मंदिरात चैत्रशुद्ध प्रतिपदेला घटस्थापना केल्यानंतर दशमीपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले,रामनवमी निमित्त पहाटे सर्व मुर्तींना अभिषेक घालून दुपारी प्रभुरामांची मुर्ती एका सजवलेल्या पाळण्यात ठेवण्यात आली.राममंदिरात श्रीधर महाराज रामदासी यांचे नार्दिय गुलालाचे किर्तन झाले.दुपारी बारा वाजेच्या सुमारास दशरथनंदन रामचंद्र महाराज ◀◀ पान ३ वर

# महेश वाघमारे, डॉ गणेश ढवळे, नरेंद्र कदम यांना मावलाई राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील बऱ्हाणपूर येथील मावलाई युवक क्रीडा मंडळ आणि व्यायामशाळेच्या वतीने पत्रकारिता (धार्मिक) ,क्रिडा व सामाजीक क्षेत्रात देण्यात येणारे राज्य पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. पत्रकारिता क्षेतातून बीड येथील जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे, सामाजिक क्षेत्रातून डॉ.गणेश ढवळे व क्रीडा क्षेत्रातून ठाणे येथील नरेंद्र कदम यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती संस्थेचे मुख्य कार्यवाह भागवत वराट यांनी दिली आहे.

बीड येथील जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात धार्मिक,अध्यात्मिक, सांस्कृतिक विषयावर प्रभावी मांडणी केलेली आहे. सामाजिक क्षेत्रात लिंबागणेश येथील सामाजीक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी जिल्ह्यातील जनतेच्या विविध प्रश्नांवर





जनांदोलन आणि लोकशाही मार्गाने आवाज उठवून सामान्य लोकांचे प्रश्न मार्गी लावले आहेत. तर क्रीडा क्षेत्रात ठाण्याचे नरेंद्र कदम यांनी अनेक खेळाडूंना घडवून त्यांना केंद्र व राज्य सरकारमध्ये नौकरीची संधी मिळवुन दिली आहे.त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेवुन मावलाई युवक क्रीडा मंडळाच्या वतीने हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

३ एप्रीलला बऱ्हाणपूर येथे पुरस्काराचे वितरण

येत्या शुक्रवार ३ एप्रील २०२६ रोजी सकाळी साडेअकरा वाजता गेवराई तालुक्यातील बऱ्हाणपूर येथील मावलाई देवीच्या यात्रे निमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे, डॉ.गणेश ढवळे व नरेंद्र कदम यांना मावलाई राज्य पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे.यावेळी संभाजीनगर येथील एसीबीचे अप्पर पोलिस अधीक्षक शशिकांत शिनगारे , बीडचे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था आर.एस.मोटे, ॲड प्रशांत राजापूरकर , जेष्ठ पत्रकार प्रमोद कुलकर्णी, दिनेश लिंबेकर, सुशील देशमुख, अविनाश वाघिरकर,धनंजय बजगुडे, आदी उपस्थीत राहणार आहेत. पुरस्कार सोहळ्यास उपस्थीत रहावे असे आवाहन पाडळशिंगी-बऱ्हाणपूरचे सरपंच रितेश साबळे, अध्यक्ष विष्णू यादव,मुख्य कार्यवाह भागवत वराट यांनी केले आहे.

# रामनवमीच्या पावन पर्वावर भारतीय स्टेट बँक वडवणीचा सेवाधर्म उजळला; फळे-पाणी वाटपातून मानवतेचा जिव्हाळा




वडवणी । प्रतिनिधी

भारतीय स्टेट बँक वडवणी शाखेच्या वतीने आज रामनवमी निमित्त सामाजिक बांधिलकी जपत एक प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. राम मंदिर चौक, वडवणी येथे नागरिकांना फळे व थंड पाण्याचे वाटप करून बँकेने सेवाभावाचा आदर्श घालून दिला.

उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना, रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. सकाळपासूनच या ठिकाणी नागरिकांची वर्दळ वाढू लागली होती. प्रवासी, कामगार, ज्येष्ठ नागरिक, महिला व विद्यार्थी यांनी या उपक्रमाचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला. विशेषतः कडक उन्हात तहानलेल्या व थकलेल्या नागरिकांसाठी हा उपक्रम दिलासादायक ठरला.

या प्रसंगी शाखा व्यवस्थापक चंद्रकांत कांबळे यांच्या नेतृत्वाखाली बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. कर्मचाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेत नागरिकांना फळे व पाण्याचे वितरण केले. प्रत्येक नागरिकाशी आपुलकीने संवाद साधत सेवा देण्याचा प्रयत्न करण्यात आला, त्यामुळे उपक्रमाला मानवी स्पर्श लाभला. रामनवमी हा भगवान श्रीराम यांच्या जन्मोत्सवाचा पवित्र दिवस असून, या दिवशी दानधर्म, सेवा व समाजहिताचे कार्य करण्याला विशेष महत्त्व दिले जाते. त्याच परंपरेला अनुसरून बँकेने हा उपक्रम राबवून धार्मिक सणाला सामाजिक उत्तरदायित्वाची जोड दिली आहे. या उपक्रमाद्वारे 'बँकिंग सेवांबरोबरच समाजसेवा' हा संदेश देण्यात आला. केवळ आर्थिक ◀◀ पान ३ वर

# सरकारच्या संवेदनाहीन धोरणाच्या निषेधार्थ धनगर समाज रस्त्यावर!

लिंबागणेश । प्रतिनिधी

धनगर समाजाला एस.टी. प्रवर्गातील आरक्षणाची अंमलबजावणी करावी या प्रमुख मागणीसाठी धनगर समाजाचे नेते दिपकभाऊ बो-हाडे यांनी मुंबई येथील आझाद मैदानावर दि.१६ मार्चपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाच्या दहाव्या दिवशी त्यांचे सासरे रामराव होळकर यांनी जालना येथील राहत्या घरी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली.

या घटनेनंतर धनगर समाजामध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून सरकारकडून केवळ आश्वासने देऊन वेळकाढूपणा केला जात असल्याचा आरोप करण्यात आला. मंत्रीमंडळातील शिष्टमंडळाने भेट घेऊन चर्चा केली असली तरी ठोस निर्णय न घेतल्याने समाजात नाराजी वाढली आहे.

या पार्श्वभूमीवर सरकारच्या संवेदनाहीन धोरणाच्या निषेधार्थ मराठा सेवक डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२६ गुरुवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे अहमदपूरअहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलनाची सुरुवात स्व. रामराव होळकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. सरकारच्या हलगर्जीपणामुळेच त्यांचा बळी गेला असल्याची तीव्र भावना व्यक्त करण्यात आली. यावेळी डॉ. गणेश ढवळे, रविंद्र निर्मळ, बाळासाहेब मोरे पाटील, बाळासाहेब मुळे, शहादेव धलपे, कृष्णा पितळे आदींची



समयोचित भाषणे झाली. विद्यार्थी गणेश ढगारे यांनी मनोगत व्यक्त केले.वक्त्यांनी सरकारने कोर्ट-कचेरी व समित्यांच्या प्रक्रियेत न अडकता धनगर आणि धनगड

## लिंबागणेश येथे रास्ता रोको

हे एकच असल्याचा शासन निर्णय तातडीने घ्यावा, तसेच राज्यपालांच्या स्वाक्षरीसह शिफारस पत्र राष्ट्रपतींकडे पाठवून आरक्षणाचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी केली. निवेदन पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, विठ्ठल राठोड, गणेश परझने सहाय्यक फौजदार लिंबागणेश पोलिस चौकी, मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे यांच्या मार्फत मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव,राजेभाऊ आप्पा गिरे, शंकर वाणी, भगवान मोरे, गणपत तागड,बंकट लगास, भगवान मोरे, रामदास मुळे, गोवर्धन गिरे,ईश्वंभर मुळे, रोहित तागड, प्रविण मुळे, अर्जुन गिरे, रामकिसन गिरे, सुमंत मुळे,बंकट लगास, संदीप मुळे, बाबासाहेब गिरे, सतिश गिरे, केशव गिरे,श्रीराम तागड, आबा राहिंज, सुरेश निर्मळ, तुकाराम गायकवाड,गोरख मुळे, संजय पावले, रमेश गायकवाड, बापुराव पितळे,बंडु ढगारे, अमोल पितळे , हनुमंत वैद्य, अंकुश गिरे,लहु गिरे, लिंबाजी गिरे, श्रीहरी निर्मळ, परशुराम गायकवाड, अशोक जाधव,श्रीधर मुळीक,शहादेव कोल्हे,आप्पा मुळे, कल्याण कोकाटे, श्याम गिरे, सर्जेराव मुळे, रामचंद्र मुळे आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ‘स्वस्त सोन्याच्या’ आमिषाने दीड कोटींची फसवणूक; फरार दाम्पत्याला अटक

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील धनकवडी-कात्रज परिसरात स्वस्त दरात सोने देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची तब्बल दीड कोटी रुपयांहून अधिक रकमेची फसवणूक करणाऱ्या फरार पती-पत्नीला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली आहे. ही कारवाई अत्यंत कौशल्यपूर्ण तांत्रिक तपासाच्या आधारे करण्यात आली असून पोलिसांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद असून आरोपी हेमंत दत्तात्रय खरोटे (वय ४५) व त्यांची पत्नी रुपाली हेमंत खरोटे (वय ३८) यांना अटक करण्यात आली आहे. दोघेही ‘अवनी ज्वेलर्स’ या नावाने धनकवडी परिसरात व्यवसाय करत होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी २०१६ ते २०२६ या कालावधीत नागरिकांना बाजारभावापेक्षा



कमी दरात सोने देण्याचे आमिष दाखवले. ‘प्रती तोळा सुमारे ६० हजार रुपये दर’ आणि ‘मेकींग चार्जेस नाहीत’ असे सांगून त्यांनी अनेकांकडून गुंतवणूक करून घेतली. सुरुवातीला थोडे सोने देऊन विश्वास संपादन करण्यात आला, त्यानंतर मोबाईलवर दागिन्यांचे फोटो दाखवून मोठ्या प्रमाणात पैसे उकळले गेले. मात्र नंतर ना सोने दिले ना पैसे परत केले.

मुख्य फिर्यादी अंजली निंबाळकर यांच्याकडून सुमारे १ कोटी ४९ लाख ९५ हजार ५०० रुपये घेण्यात आले. त्यापैकी काही रक्कम परत केली असली तरी सुमारे १ कोटी ३४ लाख ८२ हजार ५०० रुपये परत न करता फसवणूक केल्याचे उघड झाले. याशिवाय इतरही नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचे तपासात समोर आले असून एकूण रक्कम दीड कोटींच्या पुढे गेल्याचे स्पष्ट झाले आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपींनी आपले घर, दुकान आणि मोबाईल बंद करून पुण्यातून पलायन केले होते. त्यांच्याकडे तब्बल ९ मोबाईल फोन व १२ सिमकार्ड असल्याचे निष्पन्न झाले. ते सतत मोबाईल बदलून वापरत असल्याने त्यांचा माग काढणे पोलिसांसाठी आव्हानात्मक होते. तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन आणि सोशल मीडियाच्या मदतीने आरोपी देशातील विविध राज्यांत फिरत असल्याचे समोर आले. दरम्यान, ते ओला कॅबने प्रवास करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी चालकांच्या मोबाईल क्रमांकांचा व प्रवासाच्या मार्गांचा अभ्यास केला. त्यानुसार सापळा रचून मुंबई-पुणे मार्गावर दोघांना अटक करण्यात आली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, उपआयुक्त मिलिंद मोहिते व सहाय्यक पोलीस आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# फ्लॅट आणि गोडाऊनचे आमिष; ६० लाखांची फसवणूक, दत्तवाडीतील बिल्डरवर गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

फ्लॅट आणि गोडाऊन देण्याचे आमिष दाखवत तब्बल ६० लाखांहून अधिक रकमेची फसवणूक केल्याप्रकरणी दत्तवाडी येथील बिल्डर हुसेन अहमद पठाण यांच्याविरुद्ध खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे शहरातील रिअल इस्टेट व्यवहारांमधील गैरप्रकार पुन्हा एकदा समोर आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हुसेन पठाण हे अम्मार डेव्हलपर्स अ‍ॅण्ड बिल्डर्स या कंपनीचे मालक असून, त्यांनी गणेश पेठ परिसरातील ‘अमान प्लाझा’ या प्रकल्पामध्ये फ्लॅट आणि गोडाऊन देण्याचे आश्वासन देत फिर्यादीकडून मोठी रक्कम उकळल्याचा आरोप आहे. या प्रकरणी आश्विनी दिलीप सारंदा (३१, रा. गणेश पेठ, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, १ मार्च २०१६ ते ८ मार्च २०२६ या कालावधीत आरोपीने फ्लॅट क्रमांक १ (सुमारे ६०० चौ. फूट) आणि तळमजल्यावरील गोडाऊन क्रमांक १ (सुमारे १९० चौ. फूट) विक्रीसाठी व्यवहार निश्चित केला होता.

यासाठी फ्लॅटसाठी सुमारे ३८.४० लाख रुपये आणि गोडाऊनसाठी २१.८५ लाख रुपये, तसेच इतर शुल्क मिळून एकूण ६० लाखांहून अधिक रक्कम स्वीकारण्यात आली. याबाबत २०१६ मध्ये नोटरी करारनामा तसेच नोंदणीकृत करार करण्यात आला होता. मात्र, करारानुसार ३० जून २०२४ पर्यंत संपूर्ण रक्कम अदा करूनही आरोपीने ना फ्लॅटचे, ना गोडाऊनचे खरेदीखत करून दिले. उलट टाळाटाळ करत विश्वासघात केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या तक्रारीनुसार पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ४०६ (विश्वासघात), ४२० (फसवणूक), ४६८ (बनावट कागदपत्र तयार करणे), ४७१ (बनावट कागदपत्रांचा वापर) आणि ५०६(२) (धमकी) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक जयसिंग दाडे करत असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) शर्मिला सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कारवाई सुरू आहे.

# खंडणीसाठी भरदिवसा व्यापाऱ्याचे अपहरण; पोलिसांनी केली सुटका

**पुणे । प्रतिनिधी**

दीड कोटीच्या खंडणीसाठी गुलटेकडीतून व्यापाऱ्याचे अपहरण करण्यात आले असून पसार झालेल्या सराइतांना गुन्हे शाखेने अटक केली. तसेच व्यापाऱ्याचीही सुखरुप सुटका केली. याप्रकरणी प्रणव बबन निवंगुणे (वय २३), शिरीष जितेंद्र खोपडे (वय २६, रा. आंबेगाव पठार, धनकवडी), साहिल श्रीकांत खुटवड (वय २१, रा. भिलारेवाडी, कात्रज), सौरभ विश्वनाथ पवार (वय २७, रा. बावधन खुर्द), मंदार श्रीधर दारवटकर (वय ३०, रा. वडगाव बुद्रुक, सिंहगड रस्ता) यांना अटक झाली आहे. व्यापाऱ्याच्या पत्नीने स्वारगेट पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, तक्रारदार व्यापारी गुलटेकडीतील महर्षीनगर भागात राहायला आहेत.



मंगळवार २४ मार्च रोजी सकाळी नेहमीप्रमाणे तक्रारदार महिलेचे पती दुकानात गेले. दुपारी घरी जेवण करण्यासाठी यायचे. मात्र, दुपारी ते घरी आले नाहीत. दुपारी एकच्या सुमारास समाज माध्यमातील संपर्क सुविधेचा वापर करुन आरोपींनी महिलेच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला.

अनोळखी मोबाइल क्रमांकावरुन महिलेच्या पतीने संपर्क साधला. माझे अपहरण करण्यात आले आहे. माझ्या जिवाला धोका आहे. मला डांबून ठेवले आहे’, असे व्यापाऱ्याने पत्नीला सांगितले. अपहरण करणाऱ्या आरोपींनी पत्नीकडे दीड कोटी रुपयांची खंडणी मागितली. खंडणी दिल्यानंतर पतीची सुटका करतो, अशी धमकी दिली. घाबरलेल्या पत्नीने तक्रार दिल्यावर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी त्वरीत अपहरण प्रकरणाचा छडा लावण्याचे आदेश गुन्हे शाखेच्या पथकाला दिले. त्यांनी अपहरणकर्त्यांचा शोध सुरू केला. आरोपींनी खंडणीची रक्कम मित्रमंडळ चौकात आणून देण्यास सांगितले. गुन्हे शाखेच्या पथकाने तेथे सापळा लावून प्रणव निवंगुणे आणि साहिल खुटवड यांना पकडले. निवंगुणे, खुटवड यांचे साथीदार व्यापाऱ्याला घेऊन खेड शिवापूर परिसरात मोटारीतून गेल्याची माहिती मिळाली. खोपडे, पवार, दारवटकर यांना खेड शिवापूर परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या तावडीतून व्यापाऱ्याची सुखरुप सुटका करण्यात आली. अटक केलेल्या आरोपींना स्वारगेट पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम राजमाने, प्रशांत अन्नछत्रे, अजित जाधव, सहायक निरीक्षक अमोल रसाळ आणि पथकाने ही कारवाई केली.

# पुणे बजेटवर प्रशांत जगतापांचा हल्लाबोल; ‘१५,६६९ कोटींचा अर्थसंकल्प वास्तवापासून दूर’

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेच्या अर्थसंकल्पावर झालेल्या चर्चेदरम्यान काँग्रेसचे नगरसेवक व माजी महापौर प्रशांत जगताप यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका करत १५ हजार ६६९ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प ‘वास्तवापासून दूर’ असल्याचा आरोप केला. आकड्यांचा मायाजाळ निर्माण करून जनतेची दिशाभूल केली जात असल्याचे त्यांनी म्हटले.



बजेट चर्चेसाठी केवळ दोन दिवसांचा कालावधी देण्यात आल्यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली. पूर्वी सात दिवस चालणारी चर्चा आता घाईघाईत पूर्ण केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच विरोधी पक्षातील नगरसेवकांना कमी निधी देऊन भेदभाव केला जात असल्याचे सांगत सत्ताधाऱ्यांनी ‘खुनशी’ राजकारण टाळावे, असा सल्लाही त्यांनी दिला. प्रशांत जगताप यांनी प्रशासनाच्या उत्पन्नक्षमतेवर प्रश्न उपस्थित करत, प्रत्यक्ष महसूल सुमारे १२ हजार कोटी रुपयांपर्यंतच मर्यादित राहण्याची शक्यता व्यक्त केली. केंद्र व राज्यात सत्ता असतानाही राज्य सरकारकडून सुमारे ४ हजार कोटी रुपयांचा जीएसटी व अनुदानाचा निधी अद्याप प्राप्त झालेला नसल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. जागतिक परिस्थितीमुळे गुंतवणूक घटल्यास महापालिकेच्या उत्पन्नावर आणखी परिणाम होऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला. शहराच्या झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर भविष्यातील पाणीटंचाई गंभीर ठरण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. १९९१ मध्ये सुमारे २० लाख लोकसंख्येसाठी उभारलेली पाणीपुरवठा व्यवस्था आज जवळपास ९५ लाखांहून अधिक लोकसंख्येवर ताणली गेली असल्याचे त्यांनी नमूद केले. गेल्या काही वर्षांत पाणी व्यवस्थापनावर ठोस उपाययोजना न झाल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. निवडणुकीपूर्वी ५०० चौ. फुटांपर्यंतच्या घरांना संपत्ती करमाफी देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात केवळ महिलांच्या नावावरील मालमत्तांना सवलत देत ही घोषणा मर्यादित ठेवण्यात आली असून, हा प्रकार जनतेची फसवणूक असल्याची टीका त्यांनी केली.पीएमपीएमएलच्या आर्थिक स्थितीवर भाष्य करताना त्यांनी आकडेवारी मांडली. २००७ साली सुमारे ९ लाख प्रवाशांवर १६ कोटी रुपयांचा तोटा होता, तर सध्या ११ लाख प्रवासी असूनही तोटा तब्बल ८३० कोटी रुपयांवर पोहोचल्याचे त्यांनी सांगितले. पीएमपीएमएल ही प्रवाशांच्या सेवेसाठी नसून ठेकेदारांना पोसण्यासाठी चालवली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

# राजगड विकास परिषदेची नवी कार्यकारिणी जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

धनकवडी येथील लोकनेते शरदचंद्र पवार बहुद्देशीय भवनात राजगड विकास परिषदेची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांच्या कार्याचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. शिवजयंतीचे औचित्य साधत राजगड विकास परिषद या अराजकीय सामाजिक संघटनेच्या स्थापनेची अधिकृत घोषणा यावेळी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.



या कार्यक्रमाला ज्येष्ठ इतिहास संशोधक दत्तात्रय नलावडे, एमएसडीएचे अध्यक्ष मिलिंद पाटील, नगरसेवक बाळाभाऊ धनकवडे, डॉ. संभाजी मांगडे, अशोक वाडकर तसेच हंड्रेड सोशल फाउंडेशनचे राजेंद्र चोरगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माऊली दारवटकर म्हणाले, राजगड हा केवळ ऐतिहासिक वारसा नसून आपल्या अस्मितेचा केंद्रबिंदू आहे. परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी संघटितपणे लढा उभारणे आवश्यक आहे. युवकांनी या चळवळीत सक्रिय सहभाग घ्यावा, जेणेकरून राजगडचा विकास प्रत्यक्षात साध्य होईल. राजगड व भोर तालुक्यातील भूमिपुत्रांचे संघटन अधिक मजबूत करून स्थानिक प्रश्नांवर ठोस भूमिका घेण्याचा आणि विकासकामांना गती देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा देत विकासासाठी ठोस आणि परिणामकारक काम करण्याचे आवाहन केले.

# पुणे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचा संताप; निवडणूक भत्ते थकीतच

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेच्या निवडणुका होऊन दोन महिने उलटूनही निवडणूक कामकाजासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा मोबदला मिळाला नसल्याने नाराजीचा सूर उमटत आहे. निवडणूक विभागाने अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी वेगवेगळी नियमावली लागू केल्याने कर्मचाऱ्यांवर दुजाभाव केला जात असल्याचा आरोप पीएमसी एम्प्लॉइज युनियनने केला आहे. सर्व कर्मचाऱ्यांना समान भत्ता देण्याची मागणी संघटनेने केली आहे.



सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जानेवारी २०२६ मध्ये महापालिकेच्या रखडलेल्या निवडणुका पार पडल्या. या प्रक्रियेसाठी २० हजार कर्मचारी नियुक्त केले होते. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, या कर्मचाऱ्यांना जुलै २०२५ च्या मूळ वेतनाच्या आधारे अतिकालिक भत्ता, परिश्रमिक भत्ता आणि मानधन देणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्षात अतिरिक्त कामाच्या तासांचा मोबदला देताना प्रशासनाने दिवसाला केवळ तीन तास आणि एकूण कालावधीत कमाल १६५ तासांपर्यंतच भत्ता देण्याची मर्यादा निश्चित केली आहे.

याशिवाय विविध अटी व शर्ती लादण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढला आहे. या पार्श्वभूमीवर पीएमसी एम्प्लॉइज युनियनने महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिकेत अधिकारी व कर्मचारी, असा भेदभाव न करता निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार भत्ते दिले जात असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले आहे.

# दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार; ‘पोक्सो’ अंतर्गत २ जणांवर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

चंदननगर परिसरात अल्पवयीन युवतींना धमकावून त्यांच्यावर अत्याचार करण्यात आल्याच्या दोन घटना घडल्या. या प्रकरणात पोलिसांनी दोन तरुणांना अटक केली आहे. चंदननगर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या दोन्ही गुन्ह्यांमध्ये आरोपींविरुद्ध बलात्कार तसेच बालकांचे लैंगिक संरक्षण अधिनयमान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत चंदननगर पोलीस ठाण्यात एका अल्पवयीन युवतीच्या आईने दिलेल्या फिर्यादीनुसार,

आरोपी बालाजी गुरुनाथ स्वामी (वय २७, रा. लक्ष्मीनगर, येरवडा) याला अटक करण्यात आली आहे. युवती अल्पवयीन असल्याची माहिती स्वामीला होती. त्याने युवतीवर वेळोवेळी अत्याचार केला. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर युवतीच्या आईने त्याला जाब विचारला. तेव्हा आरोपी स्वामी हा पीडित युवतीच्या घरात शिरला, तिची आई आणि वडिलांना जिवे मारण्याची धमकी दिली. सहायक पोलीस निरीक्षक विकास बाबर तपास करत आहेत. अशाच प्रकारच्या आणखी एक घटनेत अल्पवयीन



युवतीवर बलात्कार करुन तिची छायाचित्रे सोशल मीडियावर प्रसारित करण्याची धमकी देणाऱ्या ऋतिक रावसाहेब लोणके (वय २७, रा. सोमनाथननगर, वडगाव शेरी) याला पोलिसांनी अटक केली. याबाबत पीडित अल्पवयीन युवतीने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, पीडित युवतीला लोणके याने विवाहाचे आमिष दाखविले, तिच्यावर अत्याचार केला. ही बाब युवतीच्या मावशीला समजली. मावशीने लोणके याला जाब विचारला. तेव्हा मला तिच्याबरोबर बोलू दिले नाही, तर सोशल मीडिया युवतीची छायाचित्रे प्रसारित करेल, अशी धमकी दिली. लोणके याच्याविरुद्ध पोलिसांकडे तक्रार देण्यात आल्यनंतर त्याला अटक करण्यात आली.

# तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गाला ४२०७ कोटींची मंजुरी

**चाकण । प्रतिनिधी**


राज्य शासनाने तळेगाव-चाकण-शिक्रापूर (महामार्ग ५४८-डी) या महामार्गाच्या कामाला अखेर मंजुरी दिली आहे. या महामार्गाच्या सुधारणा आणि विस्तारीकरणाचे सुमारे ४२०७ कोटी रुपये खर्चाचे हे काम माँटे कार्लो लिमिटेड कंपनीला मंजूर करण्यात आले आहे. आता ही कंपनी रस्त्याचे काम चार वर्षांच्या कालावधीत पूर्ण करणार आहे.

राज्यातील दळणवळण अधिक सुलभ होण्यासाठी महामार्गाचे जाळे विकसित करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. त्यानुसार ५३.२ किमीचा हा मार्ग चारपदरी उन्नत तसेच जमिनीला समांतर रस्ता म्हणून विकसित केला जाणार आहे. या महामार्गाच्या कामामुळे निश्चितच पुणे जिल्ह्यातील औद्योगिक विकासास मदत होणार आहे. या संपूर्ण परिसराची वाहतूक कोंडीतून सुटका होण्यासाठी मदत होणार आहे. हा मार्ग लवकर होण्यासाठी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार तसेच राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी व आमदार बाबाजी काळे यांच्यासह शिरूर आणि मावळच्या आमदारांनी पाठपुरावा केला होता. त्यानंतर अखेर मंत्रिमंडळाने या कामाला मंजुरी दिलेली आहे.

# पुण्यात ‘कलम १५५’ घोटाळा उघड; ४२४ प्रकरणांत मोठा गैरप्रकार!

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात जमीन महसूल अधिनियमातील ‘कलम १५५’चा गैरवापर करून बेकायदेशीर आदेश दिल्याप्रकरणी नाशिक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या तपासणीत ४२४ प्रकरणांमध्ये गंभीर अनियमितता आढळली. प्रकरणाची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली असून, दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनासह फौजदारी कारवाई करण्याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत स्पष्ट केले.




पुणे जिल्ह्यातील गेल्या पाच वर्षांतील आदेशांची चौकशी करताना नाशिक विभागीय आयुक्तांच्या समितीने तब्बल ३८,०२७ प्रकरणांची प्राथमिक छाननी केली. त्यापैकी कागदपत्रे उपलब्ध असलेल्या २,३३७ प्रकरणांचा सखोल तपास करण्यात आला असता ४२४ प्रकरणांमध्ये गंभीर अनियमितता उघडकीस आली. या प्रकरणांचे गांभीर्यानुसार ‘अ’, ‘ब’ आणि ‘क’ अशा तीन गटांत वर्गीकरण करण्यात आले आहे. ‘अ’ गटातील १३ अतिगंभीर प्रकरणांमध्ये संबंधित दोषींवर निलंबनासह फौजदारी कारवाई करण्यासाठी कायदेशीर मत घेऊन पुढील निर्णय घेतला जाणार आहे. तसेच ३० पेक्षा अधिक प्रकरणांमध्ये अनियमितता केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना तातडीने निलंबित करण्याची शिफारस समितीने केली असून, त्यानुसार कारवाईची प्रक्रिया सुरू झाली आहे. ‘ब’ गटातील गंभीर स्वरूपाच्या अनियमिततेसाठी जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची पुणे विभागाबाहेर अकार्यकारी पदावर बदली करण्यात येणार आहे, असेही बावनकुळे म्हणाले.

# पुण्यात आर टी इ प्रवेशासाठी मुदतवाढ; ३१ मार्चपर्यंत अर्जाची संधी

**पुणे । प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि आरक्षित प्रवर्गातील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत अर्ज भरण्यासाठी पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार आता पालकांना ३१ मार्चपर्यंत ऑनलाइन अर्ज भरता येणार असल्याचे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी स्पष्ट केले आहे.




‘आरटीई’ २५ टक्के प्रवेशासाठी शिक्षण विभागाने १ किलोमीटरच्या अंतरातील शाळा निवडण्याची घातलेली अट उच्च न्यायालयाने रद्द केली. त्यानंतर प्राथमिक शिक्षण संचालनालयाने आधी अर्ज भरलेल्या पालकांना पुन्हा अर्ज भरण्यासाठी, तसेच अर्ज न भरलेल्या पालकांना अर्ज भरण्याची संधी दिली आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालयाने आरटीई संकेतस्थळावर दिलेल्या माहितीनुसार आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी एक किलोमीटरची अट रद्द करण्यात आलेली आहे. त्यामुळे एक किलोमीटरच्या आतील शाळांची निवड करून अर्ज भरलेल्या पालकांना प्रवेशासाठी एक किलोमीटर, एक ते तीन किलोमीटर, तसेच तीन किलोमीटरपेक्षा अधिक अंतरावरील शाळा उपलब्ध झाल्या आहेत.